वर्ष ४५
अंक ४

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM वृत्त
|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

एप्रिल २०२५
चैत्र / वैषाख
शके १९४७

नमस्कार मंडळी

वसंत ऋतुचे आगमन झाले आहे, नुकताच गुढीपाडवा पण साजरा झाला, तुम्हा सर्वांना मराठी नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

बृहन्महाराष्ट्र मंडळासाठी एप्रिल महिना धामधुमीचा असणार आहे. मुख्य आकर्षण म्हणजे डॅलसला होणारा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा टेक्सस मैत्री मेळावा. गेले काही महिने डॅलसचे स्वयंसेवक मंडळाच्या अध्यक्षा, सौ. शामली असनारे, यांच्या नेतृत्वाखाली अहोरात्र झटत आहेत. या सर्व स्वयंसेवकांचे मी मनापासून आभार मानतो, कारण यांच्या शिवाय असे मोठे कार्यक्रम होणे हे अशक्य आहे. शनिवार-रविवार, १९-२० एप्रिल, रोजी होणारा हा मेळावा Embassy Suits and Frisco Convention Center येथे होत आहे. डॅलस बरोबरच, ऑस्टिन, ह्यूस्टन आणि सॅन अँटोनियो येथील कलाकार येथे आपले कार्यक्रम सादर करणार आहेत. बरेच दिवस कष्ट घेणाऱ्या या सर्व कलाकारांचे ही मी मनापासून आभार मानतो.

इतर कार्यक्रमांमध्ये "जर तर ची गोष्ट" हे प्रिया बापट व उमेश कामत यांचे नाटक, तसेच सुप्रसिद्ध गायिका देवकी पंडित यांचा कार्यक्रम, तसेच सुप्रसिद्ध कलाकार ओमी वैद्य यांचा स्टँड अप कॉमेडी चा कार्यक्रम आहे.

तरी मी टेक्सस मधील, तसेच टेक्सस बाहेरील सर्व रसिकांना आवाहन करतो की आपल्या मित्रमंडळींना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रमाला उपस्थित राहून आनंद लुटा. मी स्वतः या मेळाव्याला येणार असून तुम्हा सर्वांना भेटायला खूपच उत्सुक आहे. तुमचा हॉटेलचा खर्च वाचवण्यासाठी डॅलसच्या मित्रमंडळींनी तुम्हाला त्यांच्या घरी राहण्याचे आमंत्रण दिले आहे. खऱ्या अर्थाने हा "मैत्री मेळावा" म्हणून साजरा होणार आहे. तरी शक्य झाल्यास स्थानिक मंडळीकडे राहा, ओळखी वाढवा आणि मैत्री दृढ करा.

या महिन्यातला दुसरा मोठा कार्यक्रम म्हणजे, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या समाजरंगतर्फे आयोजित करण्यात आलेला, ज्येष्ठ समाजसेवक व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल “लोकमत-महाराष्ट्रीयन ऑफ द इयर” या प्रतिष्ठित पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आलेले श्री. यजुर्वेंद्र महाजन यांचा अमेरिका दौरा! १ एप्रिल ते ७ मे या काळात अंदाजे १६ शहरांना भेटी देऊन तेथील भारतीय जनतेशी संपर्क साधून दिव्यांग मुलांसाठी त्यांनी केलेल्या महान कार्याची ओळख, तसेच आत्मविश्वास वाढवणारी व्याख्याने ते देणार आहेत. तुमच्या शहरात हा कार्यक्रम होणार असेल तर जरूर सहभागी व्हा.

या महिन्यातले तिसरे आकर्षण म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे आयोजित केलेला, सुप्रसिद्ध व्याख्याता सौ. धनश्री लेले यांचा अमेरिका दौरा! २६ एप्रिल ते १२ मे या तीन आठवड्याच्या काळात त्यांचे नऊ ठिकाणी कार्यक्रम आयोजित केले आहेत, तरी तुमच्या शहरात त्यांचा कार्यक्रम असेल तर नक्की भेट द्या.

गेल्या महिन्यात क्लिव्हलँड येथील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मैत्री मेळाव्याचा आढावा घेण्यासाठी, तसेच तेथील स्वयंसेवकांची भेट घेण्यासाठी मी धावता दौरा केला. त्या वेळी या मेळाव्याची जाहिरात करण्यासाठी मी क्लिव्हलँडच्या मित्रमंडळींबरोबर डिट्रॉइट या शहरात गेलो होतो. त्यावेळी तिथे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे माजी अध्यक्ष आणि माजी विश्वस्त, तसेच सध्याचे अमेरिकेतील खासदार श्री ठाणेदार यांची भेट झाली, तेव्हा त्यांच्याबरोबर पुढील महिन्यात होणाऱ्या एका कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यात आली.



समाजरंगतर्फे अजून एक कार्यक्रम जाहीर झाला आहे आणि तो म्हणजे "परदेशातील वारी पंढरीची"! भक्ती, चिंतन, आणि व्यायाम यांचा मिलाप घडवून आणणारी ही वारी. मी सर्व मंडळाच्या अध्यक्षांना आवाहन करतो की त्यांनी या वारीत भाग घेऊन तुम्हाला हव्या असलेल्या संस्थेसाठी निधीसंकलन करावे. त्या बदल्यात देणगीदारांना टी-शर्ट व विठ्ठल-रुक्माईचे चित्र असलेले पदक देण्यात येईल. अधिक माहितीसाठी या अंकात एक लेख आहे, तसेच तुमच्या मंडळांच्या अध्यक्षांकडे पण याबद्दल चौकशी करा.

आनंदाची गोष्ट म्हणजे “विद्यार्थी सहाय्यक समिती” च्या विद्यार्थ्यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळाच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण केले आहे. त्यांच्या “कमवा आणि शिका” या योजनेमुळे तेथील विद्यार्थ्यांना शिकायची तसेच पैसे कमवायची एक संधी उपलब्ध झाली. काही मंडळाच्या अध्यक्षांनी या संस्थेला संपर्क साधून त्यांच्या मंडळाच्या संकेतस्थळच्या नूतनीकरणाचे काम दिले आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

लेखाची सांगता करण्याआधी सर्व मंडळींना श्रीरामनवमी, हनुमान जयंती, तसेच भारताचे घटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या शुभेच्छा!

जय हिंद - जय महाराष्ट्र!

आपला,

**- प्रसाद पानवळकर** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

अध्यक्षीय १
बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती २
२०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल ३
बृहन्महाराष्ट्र मंडळ मैत्री मेळावा, टेक्सास ४
जाहिरात ५
जाहिरात ६
बृहन्महाराष्ट्र मंडळ मैत्री मेळावा, क्लिव्हलंड, ओहायो ७
समाजरंग ८
जाहिरात ९
मराठीची बोलू कौतुके १०
लाइट्स, कॅमेरा आणि फिल्म फेस्टिवल! ११
मराठी शाळा - निबंध स्पर्धा १२
मराठीचा गौरव... १३
BConnect - Routes To Root १४
मराठी तितुका मेळवावा अर्थ-धर्म वाढवावा.... १४
मानाची गुढी! मराठी मनाची गुढी १५
खायके पान बनारस वाला १६
मराठी भाषा विद्यापीठ आणि महानुभाव पंथ १७
विठ्ठल - एक ऊर्जास्रोत १९
परदेशातील वारी पंढरीची २०
महाराष्ट्र कला महोत्सव २१
अक्षय दान २२
महाकुंभ २०२५- प्रयागराज २३
वाढदिवस २६
विचारांचा करा विचार २७
जाहिरात २९
MANA Paintings ३०

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना नमस्कार. बघता बघता हिवाळा सरून वसंत ऋतूची चाहूल लागली. सिॲटल् परिसरातला पाऊस कमी होऊन स्वछ सूर्यप्रकाशाचे दिवस अधेमधे यायला लागले आहेत आणि त्याच बरोबर झाडांवर कळ्या आणि इवलीशी पानं फुटायला लागली आहेत. डॅफोडील्सच्या कळ्याही आता माना वर काढायला लागल्या आहेत. येऊ घातलेल्या वसंत ऋतूचा उत्साह आमच्या स्नेहसंमेलनाच्या तयारीतही दिसतोच आहे.

सर्वप्रथम देणग्यांविषयी. आतापर्यंत पुढे आलेल्या सर्व देणगीदार आणि प्रायोजकांचे मनःपूर्वक आभार. देणगीदार आणि प्रायोजकांसाठी आम्ही संक्रांतीला पॅकेजेस जाहीर केली आणि आता स्नेहसंमेलनाच्या खात्याने बाळसं धरायला सुरूवात केली आहे. देणगीदारांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास आम्हा सर्वांसाठी अतिशय स्फूर्तीदायक आहे आणि त्यामुळे आम्हांला अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा देतो. पॅकेज बद्दलची सर्व माहिती स्नेहसंमेलनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. bmmseattle2026.org/individual-donor-sponsorship-tiers/. सर्व इच्छुक देणगीदारांना विनंती आहे की त्यांनी आमच्याशी donations@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधावा. आमच्या निधी संकलन समितीचे सदस्य तुमच्याशी चर्चा करून तुम्हांला योग्य असे कॉर्पोरेट किंवा वैयक्तिक पॅकेज निवडायला मदत करतील. देणगीदारांसाठी मुख्य दालनातील बसण्याच्या जागा आम्ही देणगी जमा झाल्याच्या तारखेनुसार निश्चित करणार आहोत, त्यामुळे सर्व इच्छुक प्रायोजकांना आणि देणगीदारांना पुढच्या रांगांमधील जागांसाठी आपले पॅकेज लवकरात लवकर निवडण्याची नम्र विनंती.

उत्तर अमेरिकेतील दृश्यकलाकारांना मंच देण्यासाठी स्नेहसंमेलनादरम्यान आम्ही ‘कला स्पंदन’ ह्या प्रदर्शनाचे आयोजन करणार आहोत. त्यामध्ये 'रंग महाराष्ट्राचा' ह्या उपक्रमाअंतर्गत ग्राफाइट, चारकोल, पेस्टल, जलरंग/गौश किंवा ॲक्रेलिक/ऑइल ह्या माध्यमांतून महाराष्ट्रीय संस्कृती, लोक आणि निसर्गदृश्ये दर्शवणारी कलाकृती सादर करावयाची आहे. मान्यवर परिक्षक आलेल्या कलाकृतींमधून अंतिम निवड करतील. शिवाय गेल्या महिन्यात सांगितल्याप्रमाणे रंगमंचीय कलाकारांसाठी आम्ही 'नाट्यसृजन' ही एकांकिका स्पर्धा आयोजित करणार आहोत. सर्व नाट्यप्रेमींना ह्या स्पर्धेची तयारी सुरू करण्यासाठी आग्रहाची विनंती. ह्या तसेच आणखी काही स्पर्धांचे नियम आणि प्रवेशिका नोंदवण्याची माहिती आम्ही लवकरच जाहीर करू.

नेहमीप्रमाणेच ह्याही स्नेहसंमेलनात उत्तर अमेरिकेतल्या कलाकारांना त्यांचे कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळेल. आपल्या कार्यक्रमांचे प्रस्ताव आम्हाला पाठवण्यासंबंधीच्या सुचनाही आम्ही लवकरच जाहीर करू. हे प्रस्ताव सादर करण्यासाठी गुढीपाडवा ते दिवाळी पाडवा अशी मुदत असेल. भारतीय कार्यक्रम समितीचे कामही जोमाने सुरु आहे. समितीने आता कार्यक्रम सादर करण्यास उत्सुक असलेले कलाकार आणि संस्था ह्यांच्याशी संपर्क साधण्यास सुरुवात केलेली आहे. आम्हाला छान प्रतिसाद मिळत आहे आणि त्यामुळे आम्हाला वैविध्यपूर्ण कार्यक्रम आणता येईल हा विश्वास आहे. कार्यक्रमांची आखणी, खर्चाचं नियोजन आणि इतर तांत्रिक बाबींची चर्चा जोर धरत आहे. कार्यक्रमांना प्रायोजक मिळवण्यासाठी सुध्दा आम्ही प्रयत्नशील आहोत.

स्नेहसंमेलनाच्या www.bmmseattle2026.org ह्या संकेतस्थळाचे बीएमएम अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनासंबंधीचे तपशील जसजसे उपलब्ध होत जातील तसे आम्ही ते वेबसाईटवर प्रकाशित करत आहोत. आम्हाला सांगण्यास अतिशय आनंद होत आहे की ही संपूर्ण वेबसाइट आमच्या उत्साही स्वयंसेवकांनी तयार केलेल्या वेब-टीमद्वारे विकसित केली जात आहे. हा प्रकल्प आमच्यासाठी अतिशय जिव्हाळ्याचा आहे आणि तो आम्ही श्रमपूर्वक आणि निष्ठेने उभारत आहोत. स्नेहसंमेलनाच्या संयोजन समितीतील सदस्यांची नुकतीच प्रदर्शीत झालेली ओळख तुम्ही वेबसाईटवर पाहू शकता.

स्नेहसंमेलनाची स्थळ सुविधा समिती आपल्या स्नेहसंमेलनाचे स्थळ म्हणजे ‘सिॲटल् कन्व्हेन्शन सेंटर' तसेच इतर समित्यांबरोबर कार्यक्रमाची रुपरेषा ठरवत आहेत. सगळ्याच समित्यांची कामे आता वेग घेत आहेत आणि त्याबद्दलची माहिती आम्ही ह्यापुढील वृत्तामध्ये देत राहू. ह्या संमेलनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती समाजमाध्यमांतून बघत रहा

फेसबूक: www.facebook.com/bmm2026seattle;

इंस्टाग्राम: www.instagram.com/bmm2026seattl_/.

तसेच आपल्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधा.

- **पराग सहस्रबुद्धे**, मार्केटींग टीम




## बृहन्महाराष्ट्र मंडळ मैत्री मेळावा
## १९ - २० एप्रिल २०२५
## टेक्सास

आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने BMM Texas मैत्री मेळाव्याची तयारी मोठ्या उत्साहात सुरु आहे. शब्दशः मैत्री मेळावा ह्या शब्दाला जागणाऱ्या या उत्सवात डॅलसकरांबरोबरच ऑस्टिन, ह्युस्टन, सॅन अँटोनिओ इथली मराठी मंडळीही हिरीरीने सहभागी होत आहेत. एकूणच हा मेळावा दणदणीत होणार ह्याची नांदी सध्याच्या तिकीटविक्रीवरून होत आहे.

'जर तर ची गोष्ट' हे प्रिया बापट आणि उमेश कामत यांचे नाटक, स्वरांजली हा श्रीमती देवकी पंडीत यांच्या गाण्यांचा कार्यक्रम, ओमी वैद्य यांची Stand up comedy, राजा शिवछत्रपती हे महानाट्य, दिमाखदार सांगता समारोह हे तर या मेळाव्यात आहेच, पण या मनोरंजनाबरोबरच, प्रत्येकालाच भावतील आणि सहभाग घ्यायला प्रोत्साहित करतील असे इतर अनेक कार्यक्रम आहेत. त्यातील काही कार्यक्रमांची ह्या वृत्तात माहिती दिली आहे.

अमेरिकेतील मराठी उद्योजक आणि लघुउद्योजकांसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे BConnect हा प्रकल्प राबवला जातो. ह्याच प्रकल्पाचे एक पान ह्या मैत्री मेळाव्यात लिहिले जाणार आहे. रविवार, २० एप्रिल रोजी मराठी उद्योजकांसाठी एक चर्चासत्र मैत्री मेळाव्यात आयोजित केले आहे. "एकमेका सहाय्य्य करू, अवघे धरू सुपंथ" या उक्तीला अनुसरून आपण सर्व मराठी उद्योजक एकमेकांच्या प्रगतीत भागीदार होऊ या असा विचार हे चर्चासत्र आयोजित करण्यामागे आहे. आपल्याला ह्या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल, तर कृपया www.dfwmm.org/form/melawa-business-connect येथे जाऊन आपला सहभाग नोंदवा.

व्यवसायाबरोबरच आपल्या वैयक्तिक आयुष्यातही मदतीचा हात देण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाचा अजून एक उपक्रम ह्या मेळाव्यात आम्ही आयोजित करत आहोत - रेशीमगाठी. विवाहोत्सुक वधू-वरांच्या पालकांना एकमेकांना भेटण्याची ही नामी संधी आहे. शनिवारी, १९ एप्रिलला हा कार्यक्रम होणार आहे. ह्यात सहभागी होण्यासाठी मेळाव्याचे तिकीट काढणे आवश्यक आहे. तसेच त्यानंतर आपल्याला मेळावा समितीकडून इमेल आल्यावर, एक google form भरणे व रेशीमगाठीसाठी अतिरिक्त $२५ चे तिकीट काढणे ह्या पुढच्या पायऱ्या आहेत.




१५००-१७०० अपेक्षित उपस्थिती असलेल्या ह्या मेळाव्यामध्ये तुमच्या उत्पादनाची जाहिरात म्हणजे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याची हमी. हि संधी कुठलाही धोरणी व्यायसायिक सोडणे अवघड. त्यासाठीच आम्ही घेऊन आलो आहोत तुमच्यासाठी जाहिरातीचे विविध पर्याय. खाली दिलेल्या वेगवेगळ्या पर्यायातून तुम्हाला योग्य ते package निवडता येईल. त्याचप्रमाणे तुम्हाला ह्या मेळाव्याचे देणगीदार होण्याचीही संधी आहे. त्यासाठी खाली देणगीचे विविध पर्याय दिले आहेत. अधिक माहितीसाठी MEC@dfwmm.org ला संपर्क करा.

- **शामली असनारे** , अध्यक्ष, डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळ


सहप्रस्तुती
BMM TEXAS
२०२५
मैत्री मेळावा
डॅलस फोर्ट वर्थ
महाराष्ट्र मंडळ
BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
प्रिया बापट सादर करीत आहे
जर तरची गोष्ट!
प्रिया बापट • उमेश कामत
पल्लवी अजय • आशुतोष गोखले
2 fun-filled days of diverse programs!
१९ आणि २० एप्रिल २०२५
स्वरांजली - देवकी पंडित
OTHER EVENTS INCLUDE:
खाद्यमहोत्सव
Closing Ceremony
लघुनाट्य महोत्सव
Bollywood Jeopardy
नृत्यकथा
Youth Special
गौरवयात्रा
Physician Network
रेशीमगाठी
Real Estate Conf.
BMM मराठी शाळा
BConnect
उत्तररंग
Child Care
Stand Up Comedy by Omi Vaidya
FOR TICKETS:
EMBASSY SUITES & FRISCO CONVENTION CENTER AT
7600 John Q Hammons Dr, Frisco, TX 75034
www.dfwmm.org/melawa2025
महानाट्य
राजा शिवछत्रपती
EXECUTIVE SPONSOR
PROGRAM TITLE SPONSORS
GOLD SPONSORS
MAITRI PARTNERS
Sinhasane Foundation
Starcore Capital
Swaramantra
Academy of Indian Classical Music
MyIndiaGlobal

# BMM Texas Maitri Melawa 2025

## Sponsorship Packages

| SPONSORSHIP TIERS & BENEFITS | Executive (Entire Event) ** $15,000 | Program Title (1 Marquee Event) ** $5,000 | Platinum $3,000 | Diamond $2,000 | Gold $1,000 | Silver $400 | Bronze $200 | Digital Event Day $200 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Physical Presence | Stall + Standee | Stall + Standee | Stall + Standee | Stall + Standee | Stall + Standee | Stall | Standee | |
| Digital Presence | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | | | |
| Sponsor logo in all email communication, website and social media | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | | | |
| Free Tickets | 4 VIP | 2 VIP | 2 Platinum | 2 Diamond | 2 Gold | | | |
| Stage Time (3 minutes) | ✓ | ✓ | ✓ | | | | | |
| Reserved Parking | ✓ | ✓ | ✓ | | | | | |
| Logo on ticketing platform | ✓ | ✓ | ✓ | | | | | |
| 30 second commercial - One marquee program | ✓ | ✓ | | | | | | ✓ |
| Sponsor logo in all community event email section from 02/01 - 04/20 | ✓ | ✓ | | | | | | |
| Commercial video play (30 second film) in Banquet - Every 3 hrs * 2 days | ✓ | | | | | | | |
| Hotel Room | 2 Rooms 2 Days | | | | | | | |

**LET'S TEAM UP! EVENT SPONSORS**

Let the festive vibes get your business more attention! Contact Mr. Satish Thopte at (972) 824-9677.

** Executive tier benefits apply to the entire event. Program Title tier event apply to any of of the 3 marquee events (drama - Jar Tar chi Goshta, musical concert by Devaki Pandit or MahaShivaNatya.

Disclaimer: DFWMM will make every reasonable effort to provide proposed benefits but cannot guarantee it due to circumstances that are out of Mandal's control. Banner and Booth availability will be determined by restrictions proposed by the venue management. Free Booth is non-transferable and can not be traded or redeemed for any other businesses/entity. Sponsors must provide their marketing material (flyer, business card, pamphlets, brochure) at the registration desk before the event.

# BMM Texas Maitri Melawa 2025

## Donation Packages

| DONATION TIERS & BENEFITS | महायजमान $20,000 | यजमान $10,000 | सहयोगी $5,000 | VVIP Packages: Elite $1,200 | VVIP Packages: Premium $600 | Platinum Packages: Elite $1,000 | Platinum Packages: Premium $500 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Donor Recognition at the event | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| Free Tickets | 6 VVIP tickets | 4 VVIP tickets | 2 VVIP tickets | 2 VVIP tickets | 1 VVIP ticket | 4 Platinum tickets | 2 Platinum tickets |
| Hotel Room | 3 Rooms 2 Days included | 2 Rooms 2 Days included | 1 Room 2 Days included | Room at Discounted Price | Room at Discounted Price | Room at Discounted Price | Room at Discounted Price |
| Reserved Rows | First 3 Rows | First 3 Rows | First 3 Rows | First 3 Rows | First 3 Rows | 6 Rows after VVIP | 6 Rows after VVIP |
| Premium Luxury Seating | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | | |
| Early Access to all Programs | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | | |
| Reserved Free Parking | On Level 1 | On Level 1 | On Level 1 | On Level 1 | On Level 1 | On Level 1 | On Level 1 |
| Separate Food Counters | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| Pre Registration | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |

**Thank You**


FOR YOUR DONATIONS!

For more information contact us at MEC@dfwmm.org.

## बृहन्महाराष्ट्र मंडळ मैत्री मेळावा
## १३, १४, १५ जून २०२५
## क्लिव्हलंड, ओहायो

दर दोन वर्षांनी होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (BMM) अधिवेशनाची आपण सगळेच वाट पाहतो, त्यात सहभागी होण्याची इच्छा बाळगतो आणि सहभागी होऊन त्याचा आनंद लुटतो. अशा अधिवेशनांमधे मराठीभाषाप्रेमी म्हणून आपण सगळ्यांनी एकत्र येण्याची ही संधी असते. काही वेळा या अधिवेशनात सहभागी होणे आपल्याला शक्य होत नाही. यासाठी अधिवेशनानंतरच्या पुढच्या वर्षी BMM ने मैत्री मेळावे घ्यायला सुरुवात केली आहे. दर दोन वर्षांनी होणारे अधिवेशन भरवणे लहान मंडळांना विविध कारणांमुळे शक्य होत नाही. तेव्हा जवळपासच्या मंडळांच्या सहभागाने त्यामानाने लहान स्वरूपातील मैत्री मेळावे आपण घेऊ लागलो आहोत. याचे पटकन लक्षात न येणारे फायदेही आहेत. एकतर अशा मेळाव्यांमधे एकमेकांबरोबर काम केल्याने मंडळांमधे साहजिकपणे विशेष संबंध निर्माण होतात आणि आपण सारे एकाच मोठ्या समूहाचे भाग आहोत ही भावना वाढीस लागते. यासाठीच या मेळाव्यांना 'मैत्री' मेळावे म्हटले आहे. याशिवाय अशा मेळाव्यांमधे तरुणवर्गाला सामावून घेता येते आणि त्यांना जणूकाही BMMच्या मोठ्या अधिवेशनाचा काहीसा अनुभव मिळतो, त्यातल्या कार्यक्रमांच्या स्वरूपाची, रचना आणि कार्यपद्धतीशी त्यांची ओळख होते. त्यातून त्यांना पुढे होणाऱ्या BMM च्या अधिवेशनास जाण्याची इच्छा निर्माण होते.

असे मेळावे २०२३ मधे वॉशिंग्टन डीसी, तसेच सिऍटलमधे साजरे झाले होते. यावर्षी क्लिव्हलंडच्या ईशान्य ओहायो मराठी मंडळाला (NEOMM) यापैकी एका मैत्री मेळाव्याचे यजमानपद भूषविण्याचं भाग्य आणि मान मिळाला आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीच्या अगदी सुरुवातीला, म्हणजे **जूनच्या १३, १४, १५ तारखेला आपण क्लिव्हलंडमधे** हा (BMM) मैत्री मेळाव्याचा सोहळा आयोजित करत आहोत.




या मैत्रीमेळाव्याला मिळालेल्या प्रायोजकांच्या भरघोस पाठिंब्यामुळे आपल्याला या मैत्री मेळाव्यासाठी क्लिव्हलंडचं प्रतिष्ठित सेव्हरन्स म्युझिक सेंटर (Cleveland's Pride - Severance Music Center) उपलब्ध झाले आहे. जगभरातले मोठमोठे कलाकार Cleveland Orchestra चे मूळस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सुंदर सभागृहात कार्यक्रम करण्यास उत्सुक असतात.

इतकं सुंदर सभागृह मिळाल्यामुळे या मेळाव्याच्या कार्यकारिणीने या सभागृहामधे शोभतील असे आणि मेळाव्याला येणाऱ्यांना आवडतील असे उत्तम कार्यक्रम ठरविले आहेत. यासाठी या मेळाव्याची कार्यकारी समिती आणि स्वयंसेवकांचे कौतुक केले पाहिजे.




शुक्रवारी संध्याकाळी कार्यक्रमाची सुरुवात पं. जितेंद्र अभिषेकींचे सुपुत्र **पं. शौनक अभिषेकी** आणि अभिषेकींचे शिष्य **महेश काळे** यांच्या "**परिसस्पर्श**" या शास्त्रीय आणि सुगम संगीताने होणार आहे. यंदाचं वर्ष क्लिव्हलंडच्या ईशान्य ओहायो मराठी मंडळाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. ५० वर्षांपूर्वी मंडळाच्या सुरुवातीच्या दिवसात पं. जितेंद्र अभिषेकी यांचा संगीताचा कार्यक्रम झाला होता. त्याची आठवण आणि त्यांना आदरांजली म्हणून हा सुयोग्य कार्यक्रम कार्यकारी समितीने ठरविला आहे.

दुसऱ्या दिवशी, शनिवारी, कार्यक्रमांची सुरुवात भव्य **उद्घाटन सोहळ्याने** होणार आहे. नवरसांवर आधारित असा हा कार्यक्रम क्लिव्हलंडच्या यजमान मंडळाचे सभासद आणि तीन सहभागी मंडळांचे सभासद मिळून सादर करणार आहेत. या कार्यक्रमाने नक्कीच सर्वांचाच उत्साह वाढणार आहे.




यानंतर सादर होईल आपले आवडते कलाकार **प्रशांत दामले, संकर्षण कऱ्हाडे, सलील कुलकर्णी, निहिरा देशपांडे आणि शुभंकर कुलकर्णी** यांचा "**इंद्रधनू**" कार्यक्रम. इंद्रधनुष्यातल्या विविध रंगांसारखाच गप्पागोष्टी, किस्से, कविता, गायन आणि वादनाचा हा कार्यक्रम भारतात खूप गाजला तो आपल्याला इथे प्रत्यक्ष अनुभवायला मिळणार आहे.

उत्तर अमेरिकेतील विविध मंडळांतील उत्साही कलाकार एकांकिका, गाणी, सहज विनोद, खुसखुशीत संवाद असे कार्यक्रम सादर करणार आहेत. या वेळी

आपल्या भोवतालच्या मंडळातले ढोल-ताशा वादक तरी कसे मागे राहतील? एकत्र संयोजन केलेला ढोल-ताशा वादन आणि प्रदर्शनाचा जोरदार कार्यक्रम सेव्हरंस सभागृहालगत असलेल्या हिरवळीवर सादर होईल.




शनिवारची संध्याकाळ रंगणार आहे ती सुप्रसिद्ध पार्श्वगायक, Indian idol सारख्या कार्यक्रमांमधे परिक्षक म्हणूनही ओळखीचे असणाऱ्या **"शान"** यांच्या चमकदार गाण्यांनी. ते खरंतर हिंदी चित्रपटातील गाण्यांसाठी प्रसिद्ध आहेत आणि सामान्यपणे ते हिंदी गाणी सादर करतात. पण खास आपल्यासाठी या कार्यक्रमात ते हिंदी गाण्यांबरोबरच मराठी गाणीही सादर करणार आहेत.

रविवारी सकाळपासून उत्तर अमेरिकेतील विविध मंडळांच्या कलाकारांचे आणखी काही कार्य्रक्रम सादर होतील आणि क्लिव्हलंडच्या नव्या आणि जुन्याजाणत्या सभासदांनी एकत्रित सादर केलेल्या समारोपाच्या कार्यक्रमाने आपल्या या मैत्री सोहळ्याची सांगता होईल.

असा एखादा सुंदर सुवासिक फुलांचा गुच्छ असावा तसा विविधतेने नटलेला भरगच्च कार्यक्रम या मैत्री मेळाव्यासाठी आखलेला आहे. याशिवाय स्वादिष्ट सुग्रास भोजन तसेच सकाळी उपाहाराबरोबरच चहा-कॉफीपानाची सोय असणार आहे हे वेगळं सांगायला नकोच. नवीन ओळखी तसच जुन्या सुहृदांच्या प्रत्यक्ष भेटी आणि न्याहारी-भोजना बरोबरच्या गप्पांचा आनंद वेगळाच! आणि खरंच, योगायोगाने शनिवारी संकष्टचतुर्थी आहे. त्या दिवशी आपल्या कार्यकारी समितीने विचारपूर्वक उपवास करणाऱ्यांसाठी उपवासाच्या पदार्थांची व्यवस्थाही केली आहे.

BMM मैत्री मेळावा आणि ईशान्य ओहायो मराठी मंडळाचा सुवर्णमहोत्सव असा मणिकांचन योग या वर्षी जुळून आला आहे. या निमित्त जी स्मरणिका काढण्यात येईल त्यामधे या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रतिभावान लेखक-लेखिका, कवी-कवयत्रींना त्यांचे साहित्य स्मरणिकेत समाविष्ट करण्याची उत्तम संधी आहे. त्यांच्या आठवणी, अनुभव अथवा ललित लेख/कविता असे साहित्य पूर्वप्रकाशित नसावे, नवीन असावेत अशी अट मात्र वाचकांना नवीन साहित्य वाचायला मिळावे म्हणून आपण ठेवत आहोत. हे साहित्य देवनागरी font वापरून MS Word file format (.docx) मधे पुढील eMail वर पाठवावे: editor-smaranika-50th@neomm.org

या मेळाव्यात सहभागी होण्याची नोंदणी तुम्ही BMMCle2025Melava.org इथे करू शकता, किंवा शेजारी दिलेलं QR Code स्कॅन करून नोंदणी करू शकता. या मेळाव्यासंबंधित काही प्रश्न असतील किंवा तपशील हवा असेल तर मेळाव्याच्या संयोजिका **तन्मयी दीक्षित** (216) 926-4264 आणि सहसंयोजिका **गीता लिमये** (440) 986-0683 यांच्याशी अवश्य संपर्क करा.

SCAN TO REGISTER

मग काय मंडळी, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या आपल्या अध्यक्षांनी, प्रसाद पानवळकरांनी केलेल्या आवाहनाला https://www.facebook.com/watch/?mibextid=wwXIfr&v=2710689699139847&rdid=AgFE6Nojx10JNsZ3 प्रतिसाद देऊन या सुंदर सोहळ्यामधे सहभागी होण्यासाठी येताय ना क्लिव्हलंडला?

- **श्रीकांत लिमये,** ईशान्य ओहायो मराठी मंडळ

## समाजरंग

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या 'समाजरंग' या उपक्रमासाठी नुकतेच बोधचिन्ह बनवण्यात आले. 'संत ज्ञानेश्वर' चित्रपटातील "ज्योत से ज्योत जगाते चलो" या गाण्यावर आधारित - एका ज्योतीने दुसरी ज्योत पेटवत आहोत (थोडक्यात एकाने दुसऱ्याला मदत केली, दुसऱ्याने तिसऱ्याला मदत केली) अशी संकल्पना आहे. अमोल महाजन यांनी हे बोधचिन्ह साकारले आहे.

सुवर्णमहोत्सव
BMM मेळावा २०२५

# 3 days of Marathi Extravaganza

# BMM2025 & NEOMM

Co-hosts: Pittsburgh, Columbus, Cincinnati, Buffalo, Detroit

## Golden Jubilee Celebration!

## June 13, 14 & 15

Only $250

Drama, Classical, Rock, Poetry, Food, Friends & Fun!






## Severance Hall, Cleveland, Ohio



50 years ago, in 1975, a handful of Marathi families living in the area at that time came together and founded Northeast Ohio Marathi Mandal (NEOMM) - a non-profit 501c(3) - to celebrate the rich and ancient Marathi culture in the Northeast Ohio region. NEOMM is a proud member of Bruhan Maharashtra Mandal (BMM) - the national body of all Marathi organizations in the USA and Canada. BMM has awarded the rights to host its prestigious 2025 Maitree-Melawa event (regional convention) to NEOMM!

**It's my great pleasure to invite you to this auspicious occasion! - Tanmayee Dixit, Covener**

**Hightlights**

Star-studdeed lineup straight from Maharashtra!
Shaan - first time ever with Marathi-Hindi songs, Prashant Damle, Mahesh Kale, Sankarshan Karhade, Nihira Joshi, Salil Kulkarni, Shaunak Abhisheki, Shubhankar Kulkarni and more!
Yayati and Devayani by popular demand!
The Best of North America Talent show!
Friends and family sit together
1 adult (18+) ticket includes 1 free child ticket
Priority access to nearest hotels | Negotiated hotel rates
3 meals, 2 breakfasts, tea/coffee snack stations
Prestigious banquet dinner with artists, sponsors and donors (available for purchase)

**Contact: Prasad Panwalker, BMM President (512) 294-3229, Dr. Medha Godbole, BMM EC (440) 241-3167 or your Local Mandal President**

## मराठीची बोलू कौतुके - गौरव सोहळा अभिजात मराठी भाषेचा!

उत्तरंग हा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा अमेरिकेतील जेष्ठ मंडळींना एकत्र आणणारा उपक्रम आहे. पंचावन्न वर्षाच्या वरील जवळपास एक हजारापेक्षा अधिक मंडळी WhatsApp द्वारे एकत्र जोडली गेली आहेत. मेधा गोडबोले यांच्या नेतृत्वाखाली उत्तरंगचे स्वयंसेवक उत्तररंग समुदायासाठी महिन्यातून दोन कार्यक्रम Zoom माध्यमातून आयोजित करतात. या कार्यक्रमात विविध विषय हाताळले जातात.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी कवी कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवस '२७ फेब्रुवारी' हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून आपण साजरा करतो. त्याबरोबरच मराठी भाषेला गेल्याच वर्षी अभिजात भाषेचा दर्जाही मिळाला. हा दुग्ध-शर्करा योग उत्तरंगच्या स्वयंसेवकांना मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने काहीतरी करण्यासाठी स्फूर्ती देऊन गेला आणि त्यातूनच साकार झाला **'मराठीची बोलू कौतुके'** हा कार्यक्रम!

कार्यक्रमाची तारीख ठरली मार्च १, २०२५. कार्यक्रमामध्ये मराठी भाषेची विविध अंगे वेगवेगळ्या माध्यमातून हाताळायची असे ठरवून सगळे कामाला लागलो. गाणी, खेळ, अभिवाचन, लघुनाट्य, वैचारिक लिखाण अश्या माध्यमांचा वापर करायचे ठरवले. प्रत्येकाने आपल्या आवडी नुसार वेगवेगळ्या जबाबदऱ्या स्वीकारल्या. उत्तरंग टीम बाहेरील काही व्यक्तींशीही बोललो. तेही आनंदाने कार्यक्रमात सहभागी झाले. कार्यक्रमाची तारीख ठरल्यावर पुढील दोन महिने विषयाचा अभ्यास करणे, सादरीकरण कसे करावे हे ठरविणे, त्याच्या तालमी या धामधुमीत एकदम मस्त गेले! शीतल रांगणेकरने कार्यक्रमासाठी सुंदर आमंत्रण पत्रिका बनवली, तर शुभदा वकनळ्ळी यांनी कार्यक्रमाची रूपरेखा सांगणारा छानसा मजकूर लिहिला. आमचे भाग्य थोर त्यामुळे अतिशय अनुभवी संचालक श्री. शीतल डोळस कार्यक्रमाचे संचालन करायला स्वखुशीने तयार झाले.

रंगीत तालीम करताना आलेल्या अडचणी, त्यावर केलेली चर्चा, अनुभवी सहकाऱ्यांनी दिलेल्या सूचना प्रत्यक्ष कार्यक्रमासाठी खूपच उपयुक्त ठरल्या. बघता बघता १ मार्च उजाडला. आम्ही सगळे एकदम सज्ज, अगदी झकास मराठमोळ्या पेहरावात! मनात थोडीशी धाकधूक की सगळा कार्यक्रम कुठलाही तांत्रिक बिघाड न येता व्यवस्थित पार पडेल ना? निवेदक आणि सगळे कलाकार मिळून अठराजण, सात वेगवेगळया ठिकाणी, सात वेगवेगळ्या मंडळांतर्फे! बरोबर ३ वाजता झूम वर आलेल्या सगळ्या उत्तररंग समुदायाचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर यांनी कार्यक्रमाला येऊन आम्हा सर्वांचाच आनंद द्विगुणित केला. कार्यक्रमाची सुरवात कुसुमाग्रजांनी लिहीलेल्या 'माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा' या मिड मिशिगन मराठी मंडळाच्या (M4च्या) कलाकारांनी सादर केलेल्या जोशपूर्ण गीताने झाली. फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळाच्या सभासद भाग्यश्री बारलिंगे यांनी मराठी भाषेच्या इतिहासाबाबत अतिशय महत्वपूर्ण माहिती दिली. पु. ल. देशपांडे यांनी 'ती फुलराणी' नाटकासाठी लिहिलेल्या नांदीचे अभिवाचन केले M4 च्या कलाकारांनी. या नांदीमध्ये पुलंनी स्वर, व्यंजन, शब्दाची निर्मिती याबद्दल सुंदर भाष्य केले आहे. पिट्सबर्ग महाराष्ट्र मंडळाच्या सभासद सुचिता कुलकर्णी–लांबोर यांनी मराठी विरामचिन्हे या विषयी मनोरंजक माहिती दिली आणि एकाच शब्दाचे अनेक अर्थ सांगणाऱ्या विनोदी लेखाचे अभिवाचनही केले. कॅलिफोर्नियाच्या अनिता कांत यांनी केवळ मराठी भाषेतच असलेल्या अश्या विविध काव्यप्रकारांची सुंदर माहिती दिली. त्यांच्या बरोबरीने शीतल आणि शलाका डोळस यांनी त्यातील काही काव्यप्रकारांची गाणी सादर करून अजूनच रंगत आणली. ईशान्य ओहायो मराठी मंडळाच्या श्री. श्रीकांत लिमये यांनी मराठी भाषेची थोरवी गाणाऱ्या इ. स. १६१४ मधील मराठी कवी फादर थॉमस स्टीफन्स यांनी लिहीलेल्या ओव्या सादर केल्या आणि त्याबद्दल महत्वाची माहितीही सांगितली. त्रिवेणी मित्र मंडळाच्या सभासदांनी सादर केलेल्या मराठी बोलीभाषेवरील लघुनाटयांनी तर सगळ्यांनाच पोट धरून हसवले! त्रिवेणी मित्र मंडळाच्या निवेदिता बक्षी यांनी आयोजित केलेल्या म्हणी ओळखण्याच्या खेळात सर्वच उत्तरंगी मंडळींनी हिरीरीने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सांगता M4च्या कलाकारांनी श्री. सुरेश भट यांचे अंगावर रोमांच आणणारे 'मराठी अभिमान गीत' सादर करून केली. दोन तासाचा हा कार्यक्रम सर्वांनाच खूपच भावला!

- **मानसी उपाध्ये,** ओकेमॉस, मिशिगन

उत्तररंग स्वयंसेवक

**राशिभविष्य : एप्रिल २०२५**

**"मीन राशीत या महिन्यात सहा सहा ग्रह असणार. बघूया ते काय गोंधळ घालणार आहेत."**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

# लाइट्स, कॅमेरा आणि फिल्म फेस्टिवल!

नमस्कार मंडळी, BMM कार्यकारिणीच्या वतीने एक अतिशय महत्वाची आणि उत्साहाची बातमी कळवण्यास अत्यंत आनंद होतो आहे. पहिल्या वर्षाच्या उत्तुंग यशानंतर, नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशन (NAFA) ही नॉन-प्रॉफिट संस्था २०२५ च्या फिल्म फेस्टिवलची तयारी करीत आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) या उपक्रमात भागीदार म्हणून सहभागी होणार आहे.

आपल्यापैकी बऱ्याच जणांनी NAFA म्हणजेच North American Film Association या संस्थेविषयी ऐकले असेलच.




कॅलिफोर्निया मधील एक अतिशय accomplished entrepreneur आणि राष्ट्रीय पारितोषिक विजेते चित्रपट निर्माते अभिजित घोलप यांच्या संकल्पनेतून NAFA ही संस्था गेल्या वर्षी स्थापन झाली. आपली मराठी चित्रपटसृष्टी महाराष्ट्राबाहेरच नाही तर देशाबाहेर जाऊन अमेरिकेत स्थापन व्हावी आणि त्यायोगे मराठी चित्रपटांची निर्मिती आणि वितरण अमेरिकेत व्हावं, आणि त्याचबरोबर मराठी चित्रपट महोत्सव ही अमेरिकेत करता यावा हे ध्येय आणि दृष्टी घेऊन त्यांनी या संस्थेची स्थापना केली. अल्पावधीतच ७०० हुन अधिक मेंबर्स NAFA शी जोडले गेले. आपल्यामधील अनेक गुणी कलावंत, दिग्दर्शक, नृत्य दिग्दर्शक, गायक, कवी, सिनेमॅटोग्राफर्स, संकलक आदींना घेऊन इथल्याच विविध विषयांवर मराठी चित्रपट, वेब सेरीज, डॉक्यूमेंटरी, अशा कलाकृती तयार कराव्यात आणि जगभरातील मराठी रसिकांपर्यंत त्या पोचवाव्यात हा तर हेतू आहेच पण सगळ्यात महत्वाचं म्हणजे नॉर्थ अमेरिकेमधील चित्रपट प्रेमींना NAFA च्या माध्यमातून एकत्र जोडणे हा मुख्य हेतू आहे.

NAFA तर्फे गेल्यावर्षी निर्माल्य, पायरव आणि Dear Pra या तीन शॉर्ट फिल्म्स ची निर्मिती झाली. त्या तिन्ही फिल्म्स Pune International Film Festival मध्ये यावर्षी दाखवण्यात आल्या. अमेरिकेतील विविध प्रांतातील कलाकारांनी एकत्र येऊन बनवलेल्या या कलाकृती भारतामधील चित्रपट रसिक आणि दर्दी यांच्यासमोर सादर झाल्या ही खूपच आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे.

NAFA तर्फे अमलताश, नवरा माझा नवसाचा – २, मानापमान अशा अनेक उत्तम चित्रपटांचं वितरण अमेरिकेत झालं आणि होत राहील.




आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे NAFA तर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट महोत्सवाचा दिमाखदार सोहळा गेल्या वर्षी जुलै मध्ये कॅलिफोर्निया थिएटर मध्ये पार पडला. Pune International Film Festival चा त्याला पाठिंबा मिळाला. भारतातून डॉ जब्बार पटेल, दिलीप प्रभावळकर, सचिन व सुप्रिया पिळगावकर, निवेदिता जोशी, सुबोध भावे, प्रसाद ओक, महेश आणि मेधा मांजरेकर, डॉ. सलील कुलकर्णी, मृणाल कुलकर्णी, अश्विनी भावे, उमेश कुलकर्णी अशा अनेक नामवंत कलाकारांनी या महोत्सवाला हजेरी लावली. दिठी, स्थळ, सलतात रेशीमगाठी असे उत्तम दर्जेदार चित्रपट, शॉर्ट फिल्म्स, Panel discussions, आणि दिग्गज कलाकारांचे चित्रपट निर्मितीविषयीच्या विविध विषयांवरचे Masterclasses ही या महोत्सवाची वैशिष्ट्ये होती. पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेला हा चित्रपटमहोत्सव सर्वांनाच भारावून गेला. आपल्यापैकी अनेक जणांनी या महोत्सवाला हजेरी लावून हा अनुभव प्रत्यक्ष घेतला आहेच.

आता या वर्षीच्या २५, २६, आणि २७ जुलै ला परत एकदा NAFA फिल्म फेस्टिवलचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये चित्रपटांचे premiers, शॉर्ट फिल्म्स, वर्ल्ड सिनेमा, Masterclasses, Meet and Greet, workshops हे सगळं आणि बरंच काही असणार आहे. त्याविषयीची अधिक माहिती NAFA website www.northamericanfilmassociation.org वर उपलब्ध आहे. BMM च्या सोशल मीडिया वरून सुद्धा या फिल्म फेस्टिवल बद्दल लवकरच अधिक माहिती पुरवण्यात येईल.

BMM च्या सर्व मंडळांकडून या फेस्टिवलला सहर्ष पाठिंबा मिळेल आणि मंडळांमधील चित्रपटप्रेमी मोठ्या संख्येने या महोत्सवाला हजेरी लावतील अशी आशा आहे. त्यासाठी हे सस्नेह निमंत्रण....Festival ची तिकिटे NAFA च्या वेबसाइटवर लवकरच उपलब्ध होतील.

www.northamericanfilmassociation.org आपली तिकिटे लवकरात लवकर बुक करा. तर भेटूया... NAFA फिल्म फेस्टिवल July 2025 च्या सोहळ्यात!! मन:पूर्वक धन्यवाद!

**- NAFA कार्यकारिणी आणि BMM कार्यकारिणी**

## मराठी शाळा - निबंध स्पर्धा

मराठी शाळेतर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतल्या निबंधापैकी निवडक ६ निबंध प्रत्येक महिन्यात १ हयाप्रमाणे वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

### निबंध १

### माझा आवडता सण

मी प्रचंड आळशी आहे. माझ्या नाकर्तेपणाला सामाजिक, धार्मिक किंवा आरोग्यशास्त्राचा आधार मिळाला की मी खूष. आमचा fire alarm आगीला धूप घालत नाही पण तेल तापू लागलं रे लागलं की कानठळ्या बसतील अशी बोंबाबोंब करतो. आणि त्या आवाजाने माझी सेजीबाई (कुत्री) घाबरते. भूतदयेच्या सबबीवर दिवाळीतल्या चकल्यांचा (मनातला) बेत रद्द करावा लागतो. मोदक न करायचं कारण आहारशास्त्राला पटेल असं आहे. आमच्या जवळच्या भारतीय दुकानात मिळणाऱ्या पिठीला बरेचदा धापट वास येतो. गणपतीबाप्पाला नैवेद्यापुरते मोदक करते बाकी सर्वांवर बेडेकरांची कृपा.

बाकीचे सण साजरे होता होता दिवाळी जवळ येते आणि माझ्या मनात लहानपणापासून दडलेली एक प्रतिमा एकदम डोळ्यासमोर उभी राहते. चाळीसेक वर्षां पूर्वी एक मराठी चित्रपट खूप गाजला होता, देवावरची श्रद्धा एकीकडे आणि नास्तिकता दुसरीकडे, आणि त्यामुळे होणारे संघर्ष यावर आधारित तो एक कौटुंबिक चित्रपट होता: 'अष्टविनायक'. त्यातल्या नायिकेच्या तोंडचं एक गाणंआता पारंपरिक मराठी स्त्रियांसाठी घोषगान झालं आहे. 'आली माझ्या घरी ही दिवाळी'. अत्यंत भाविकतेने, काठापदराची साडी, अनेक सौभाग्यलेणी अशा मराठमोळ्या अवतारात वंदना पंडीत दारात पणत्या लावताना हे गाणं म्हणते. दिवाळी जवळ आली की ते गाणं अजूनही माझ्या मनात रुंजी घालत राहतं.

मग मी नव्या जोमाने दिवाळीच्या तयारीला लागते.

बाहेर मिशिगनची कडाक्याची थंडी, सुट्टी तर नाहीच पण ऑक्टोबरअखेरी किंवा नव्हेंबरच्या सुरुवातीला कामाचा डोंगर. घरी यायला उशीर होतो, मी दमलेली असते पण दिवाळीने झपाटलेली असते. अभ्यंगस्नान जाऊ दे, निदान दारात रांगोळी तरी काढू, मुंबईतून हौसेने आणलेले साचे सुदैवाने मिळतात. तेवढ्यापुरती का होईना साडी नेसते आणि दारात रांगोळी काढायला घेते. गायीची पावलं जमिनीवर जेमतेम उमटतात, मी 'हुश्श' म्हणत उठते तेवढ्यात वाऱ्याने रांगोळी उडू लागते. पणत्या तर पेटता पेटता विझतात.

जेमतेम एक लागली या समाधानात मी वळणार तर बांधावरचा भोपळा (हॅलोवीनचा!) माझ्या पदरावर पडतो, मी अडखळते — पण एक कल्पना सुचते, तो भोपळाच रांगोळीच्या सजावटीसमोर ठेवला - बाहेरच्या माणसाला भोपळानशीन गोपद्म दिसत नसतील पण निदान सगळी सजावट सुरक्षित राहिली ना!

पाच मिनिटांच्या प्रथेला पन्नास मिनिटं खर्ची होतात, भर थंडीत मी घामाघूम होते. एवढं करून घरचे नेमके त्याच दिवशी रात्री उशिरा येणार असतात, हा सोहळा बघायला बाहेर कुणीच नसतं. आपण दुसऱ्याला दाखवायला का सण साजरे करतो? नाही! पण मी गिरगावातल्या एका चाळीत वाढले. 'आठशे खिडक्या नऊशे दारं, कुण्या वाटेनं बा गेली कि नार' हे वर्णन तंतोतंत लागू पडेल अशी ती इमारत होती (आणि अजूनही आहे!) गिरगावात वाढल्यामुळे अगदी हरितालिकासुद्धा सामुदायिक पद्धतीने साजरी केल्याच्या आठवणी आता मला सतावत असतात. दिवाळी तर एक पर्वच असायचं!

वसुबारसेच्या सकाळी मैत्रिणीबरोबर नाक्यावर जायचं, गायीला चारा भरवायचा, संध्याकाळी आईला दारात (साचा वापरून!) गोपद्म काढायला मदत करायची. आमच्या घरी सुक्या खोबऱ्याच्या करंज्या कधीच खपल्या नाहीत - माझा काका त्यांना 'खुळखुळा' म्हणायचा! ओल्या नारळाच्या करंज्या मात्र प्रिय, तो करायचा दिवस देखील हाच! धनत्रयोदशी हा तयारीचा आणि माफक नटण्याचा दिवस - शिक्षकाचं घर आमचं, पुस्तकं हेच धन! हाताशी वेळ असल्याने मजल्यावर सोऱ्यासम काही उपकरणांचे आदानप्रदान व्हायचे. वर्षभर पैसे साठवून कुणी दिवाळीच्या निमित्ताने सोन्याचा एखादा छोटा दागिना (पेठे किंवा वैद्यशेटे यांच्याकडून करणावळ देऊन) करून घेतला असेल तर तो त्या दिवशी दाखवला जायचा. दिवाळीच्या चार दिवसांपैकी कोणत्या दिवशी आणि का तो घातला जाणार आहे याची चर्चा व्हायची. शालेय आयुष्य गणवेषात जायचं- नवे कपडे वाढदिवस आणि दिवाळी या निमित्तानेच घेतले जायचे. ही गडबड घरोघरी तर तिथे खाली चौकात रात्री उशिरा जागून मोठा कंदील केला जायचा. रात्री आठ वाजता जेमतेम काठ्यांचा सांगाडा दिसायचा पण कसा कोण जाणे नरकचतुर्दशीच्या पहाटे ४ वाजता एक दिमाखदार कंदील उत्सवाची आणि चौकाची शान वाढवायचा. मजल्यावरच्या एका मुलाला प्रचंड उत्साह! दिवाळी पहाट ४:३०ला सुरू करूनच दणक्यात फटाके वाजवायचा. गिरगावकर पाण्यासाठी पहाटे उठतातच - पाणी भरू की अभ्यंगस्नान करू? हा प्रश्न कसातरी सोडवला जायचा.

घरोघरी उटण्याचे वास यायचे- निवडणुकांचं वर्ष असेल तर काही राजकीय पक्ष उटण्याच्या बदल्यात मतं मागायचे! सणांना तेवढाच राजकीय वास असायचा! मग दिवसभरात 'ये, माझ्या चकल्या या खेपेला छान खुसखुशीत झाल्या आहेत, खाऊन बघ', 'अहो माझे अनरसेना यंदा हसले... काय करू त्या पिठाचं?'अशा गप्पांमध्ये भाग घ्यायचा! मधल्या गच्चीत पुरुष मंडळी गप्पा मारत उभी असली तर एखादी गृहिणी तोंडात टाकायला कडबोळ्यांचं ताट किंवा वाडगाभर चिवडा पाठवून द्यायची..

हे सगळं मन:पटलावरून सरकू लागलं की 'शेकडो आठवणी आणि डोळाभर पाणी' अशी अवस्था होते. ती प्रतिमा बाळगून इथे मिशिगनमध्ये दिवाळी साजरी कशी करायची? मीच निरुत्साही झाले तर माझ्या मुलीला दिवाळी कशी कळणार?

एकदा का अशा विचारांनी घेरले की सणाचा आनंद राहतो दूर, 'संस्कृती' नामक देवीचा शाप मिळतो आहे असं वाटू लागतं. 'आपले सणवार, कुळाचार, पद्धती यांचा खजिना पुढच्या पिढीकडे द्यायचा' हे वाक्य सफाईने लिहिलं जातं परंतू परिघा बाहेर गेल्यावर तो खजिना आहे, ओझं नाही याची खबरदारी घ्यावी लागते. इथे आटापिटा करून दिवाळी- विश्व  निर्माण करण्यापेक्षा मी मुलीला घेऊन भारतातच गेले तर? खास गिरगावची दिवाळी दाखवता येईल असा विचार केला. तिने खूप धमाल केली, मी कळतनकळत 'तेंव्हा आम्ही असं करायचो, आता तुम्ही तसं करता' नकारात्मक तुलना करण्याचा मोह टाळला. चाळ बदलली, अमेरिका रोज बदलत आहे, मग दिवाळीचं स्वरूपदेखील बदलणारच ना? आणि मी तरी कुठे पूर्वीची राहिले आहे?

*****

दिवाळीचा महिना सरतो आणि नाताळाची चाहूल लागते. बाहेरचा बर्फ, आजूबाजूचं वातावरण, सुट्ट्या आणि निवांतपणा हे जुळून येतं आणि आम्ही सगळेChristmas tree सजवू लागतो. पार्श्वभूमीवर Whatsapp ओरडत असतोच 'हा आपला सण नाही. परक्यांची संस्कृती जपता पण आपले सगळे कुलाचार विसरता..' परत संस्कृती! एका बाजूला व्यापक (मानवी नीतिनियम) दर दुसरीकडे आकुंचित-सकुंचित (शहरी, जातीनिष्ठ, वर्गवाचक)अशी ही संकल्पना आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संस्कृतीची व्याख्या दिली आहेती अशी: 'संस्कृती म्हणजे मानसिक उन्नतीचा दर्शक असा जीवनक्रम किंवा आदर्श जीवनपद्धती.' व्याख्या पटण्यासारखी आहे पण तिने स्थलकालाची दखल घेतलेली जाणवत नाही. भाषेप्रमाणे संस्कृती देखील प्रवाही आहे. परधर्म सोडाच, आपला पाडवासुद्धा दक्षिणेत उगादीचं रूप धारण करतो! 'अंधारावर प्रकाशाचा, अज्ञानावर ज्ञानाचा आणि वाईटावर चांगल्याचा प्रतीकात्मक विजय' हे एक सामायिक तत्व सोडले तर दिवाळीचे धार्मिक महत्त्वही भारतामध्ये प्रादेशिकदृष्ट्या बदलतेच.

प्रांतागणिक चालीरीती बदलतात, आपण बदलतो, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या पद्धती कळतनकळत स्वीकारतो, 'ते त्यांचं, हे आमचं' यातली तफावत हळूहळू कमी होत जाते. तरीही आपले सण जवळ आले की परस्परविरोधी आवाज आपला फणा वर काढतात!

हे वर्ष संपायला आता काही दिवसच उरले आहेत. त्याबाबतीतही दुमत आहेच म्हणा, "तेआपलं नाही त्यांचंआहे"! कटाक्षाने दिवसागणिक मी मनातली नवी जुनी चित्रं पुसणार आहे, आली माझ्या घरी ही *माझी* दिवाळी हे लक्षात घेणार आहे, स्वतःसाठी बनवलेल्या चौकट्या तोडून टाकणार आणि सरळ अमरीश पुरीचा सल्ला मनावर घेणार ...

"जा सिम्रन जा, जीले अपनी जिंदगी!"

- **ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर**
ट्रॉय मराठी शाळा, डेट्रॉईट, मिशिगन

## मराठीचा गौरव...

कुसुमाग्रज यांच्या स्मरणार्थ ईस्ट बे मराठी मंडळाच्या मराठी शाळेत मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते. अक्षरांपासून चित्रे, कविता आणि वकृत्त्व या तीन प्रकारच्या स्पर्धा या वेळी आयोजित करण्यात आल्या होत्या.

अमेरिकेत राहून मराठीचे महत्त्व जपणाऱ्या लहानग्यांनी कविता आणि वक्तृत्वाने सगळ्यांना अवाक करुन टाकले.

२ मार्च रोजी झालेल्या या कार्यक्रमात मराठी अक्षरांपासून काढलेल्या चित्रप्रदर्शनाने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. इंग्रजी पुस्तकाचे मराठीत वर्णनापासून ते मराठी शाळेतल्या अनुभवापर्यंत अनेक विषयांवर मुलांनी मन भरून भाष्य केले. एक होती इडलीपासून ते फक्त लढ म्हणा पर्यंत वेगवेगळ्या कवितांनी मोठ्यांना आठवणींची सैर करून आणली.

या सगळ्यांमागे इबीएमएम मराठी शाळेच्या प्रत्येकाचे कष्ट होतेच. चित्र स्पर्धेचे परिक्षक रेखा जोशी आणि अक्षता जोशी हे होते तर कविता आणि वक्तृत्वाचे परिक्षक नेहा कुलकर्णी आणि सुधीर धर्माधिकारी हे होते. या स्पर्धेला भरभरुन प्रतिसाद मिळाला. सुमारे ७५ मुलांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

## BConnect - Routes To Root

BMM Bconnect Brings Routes to Root An Internship Program for College Students in North America. Routes to Roots (R2R) is a pioneering career development program conceptualized and promoted by Bruhan Maharashtra Mandal (BMM) and Authentica for BMM members. The program creates a vibrant network of professionals committed to maintaining cultural ties while advancing global careers. Beyond enriching individual experiences, R2R strengthens connections between the Indian diaspora and Maharashtra, creating a lasting impact for participants, their communities, and their professional trajectories.

Routes to Roots (R2R) is a transformative 8-week program that connects youth from North America with their cultural heritage while developing valuable professional skills in Maharashtra, India. Through carefully matched internships with leading organizations across sectors including IT, Healthcare/Shadowing, Engineering Manufacturing and NGOs, participants gain hands-on experience while immersing in different parts of Maharashtra Please send it to your Mandal membership - Only limited Spots. Registration has begun.

This program will have two cohorts one Starting on June 3 and second on June 23rd. Please visit https://bmmonline.org for registration.

**As promised to put an additional 20% of total donations received for LA Fire Funds, MMLA distributed $3000 between Seva International, LA Fire Department Foundation and California Fire Foundation.**

## मराठी तितुका मेळवावा अर्थ-धर्म वाढवावा....

अमेरिकास्थित मराठी समुदायाला अर्थव्यवस्थेबाबत सजग करण्यासाठी BMM एक उपक्रम घेऊन येत आहे, आपल्या सर्वांसाठी: ***BMM अर्थ मंथन***

**दर रविवारी सायंकाळी 7PM-8PM (Eastern Time)**

ह्या ग्रुप मार्फत खालील विषय चर्चिले जाणार आहेत: बॉण्ड म्हणजे काय? स्टॉक म्हणजे काय? ऑप्शन म्हणजे काय? फ्युचर म्हणजे काय? फोरेक्स म्हणजे काय? इत्यादी..

This new WhatsApp group started to increase an awareness of investments / trading avenues in stocks, bonds, options, futures, commodities, Currencies Crypto's, real estate, etc & Financial information enrichment for the Marathi community.

- The purpose is for investment discussions and education.
- This group is *NOT* for investment advice or investment recommendations.
- This group is *NOT* for selling / marketing any investment or trading products or services.

Based on the discussions happening on this group, if you take investment decisions; then BMM, this group's admins & members will not be responsible for losses or gains.

We strongly encourage you to take the advice from registered and certified investment professionals.

हा नवा उपक्रम सुरू करण्यासाठी शिकागोच्या सौ. उल्का नगरकर आणि श्री. मंदार जोगळेकर यांनी पुढाकार घेतला आहे.

हा ग्रुप जॉईन करण्यासाठी खालील गूगल फॉर्म भरणे आवश्यक आहे.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSf1SIHzjG0OfWjDFaZRmfc2MwSpoRvObHz3PHeKt7XPFv9N9A/viewform

## मानाची गुढी! मराठी मनाची गुढी

नववर्षाची पहाट होता गुढी उभारु भाग्याची
स्थैर्याची सामर्थ्याची सिद्धी मिळो मांगल्याची|
स्वास्थ्य सदा सर्वां लाभो मुखी माधुर्याची भाषा
उत्तुंग निळ्या आकाशी भिडूदे यशकीर्तीची गाथा||



हे जरी खरं असलं, तरी, 'पश्चिमेमधे वारे वाहे अजूनही गारेगार, चैत्र येऊनी, उब लेवूनी, होई मनोमनी स्वार'.

हो की नाही? भारतात वाढत असताना, होळी, रंगपंचमीची मौज मस्ती संपेपर्यंत गुढी पाडव्याची चाहूल लागायची. बाजारात साखरेच्या गाठ्या, माळा लटकताना दिसायच्या. कडुनिबांची पाने जरी घरच्या झाडाची किंवा आसपासच्या परिसरातून आणता यायची, तरी त्यांच्या झुबकेदार जुड्या बाजारात दिसायच्या. जवळून गेलं की टोकदार पानांचा, पांढऱ्या नाजूक फुलांचा आणि निबोण्यांचा एक वेगळाच तुरट, कडवट पण ओळखीचा सुगंध यायचा. पिवळ्या केशरी झेंडूच्या टपोऱ्या फुलांचा सुगंध तर अवर्णनीय असायचा. घरोघरी पुरणा वरणाच्या नैवेद्याची तयारी दिसायची. आहेर म्हणून मिळालेल्या किंवा नुकत्याच नव्या घेतलेल्या साड्या, आई, आजी, आत्या मुद्दामहून जपून ठेवायच्या. 'आधी गुढीला ध्वज म्हणून साडी नेसवू आणि मग घडी मोडू' हा बहुतेक घरी संवाद असायचा, आणि आताही कदाचित बऱ्याच घरी असेल. मी सुद्धा प्रत्येक वर्षी एखादी साडी घडी न मोडता गुढीसाठी म्हणून मुद्दामहून ठेवते.

काही वर्षांपूर्वी मात्र गुढीसाठी नवनवीन तयार वस्त्र सहजतेने बाजारात उपलब्ध होऊ लागली आणि भारतातल्या अनेक मित्रमंडळींच्या फोटोतून इथपर्यंत झळकू, डोकावू लागली. वेगवेगळ्या पद्धतीने घातलेल्या निऱ्या, पंख्यासारख्या नीटस घातलेल्या घड्या, सुबकपणे त्यांचे केलेले सुशोभीकरण, रेशमाच्या, खणाच्या, इरकल कापडाच्या, पैठणी साड्या, जरीच्या कापडापासून तयार केलेल्या रंगीबेरंगी, गुढी वस्त्रांची रेलचेल दिसू लागली. पण आपलं इथे कसं असतं माहित आहे ना? एखादा नवीन प्रकार लोकप्रिय होऊन आपल्यापर्यंत पोहोचून, किंवा आपण तो भारतात जाऊन आणेपर्यंत, आणि त्या गोष्टीचा, त्या आनंदाचा आस्वाद घेईपर्यंत, त्या गोष्टीचे नावीन्य मात्र सर्वदूर सर्वव्यापी पसरून, सर्वसाधारण होऊन गेलेले असते, नेहमीचे होऊन गेलेले असते. मात्र त्यांचे कुतूहल, आणि उत्साह आपल्याला, म्हणजेच पश्चिमेतल्या भारतवासीयांना उदंड, अगदी सपाटून असते.

गुढी वस्त्राच्या बाबतीत माझ्यासोबत असेच घडले. गरज शोधाची जननी असल्यामुळे आणि येत्या गुढीपाडव्याला नाविन्यपूर्ण गुढी उभारण्याचा विचार प्रवाहात असताना मेघाताईंचा फोन आला आणि त्यांनी नेमका याच विषयाला हात घातला. क्लिष्ट आणि कलाकुसरयुक्त शिवणकामात निष्णात असलेल्या मेघाताईंनी 'गुढीपाडव्यानिमित्त हातशिलाईने गुढी वस्त्र शिकवण्याची कार्यशाळा करता येईल का' या बद्दल विचारणा केली. मग काय, 'नेकी और पूछ पूछ' या उक्तीप्रमाणे मी मराठी विश्वच्या कार्यकारिणी मंडळाकडून संमती घेऊन कार्यशाळेच्या तयारीला लागले. माहितीपत्रकापासून ते कार्यक्रमापर्यंत एका आठवड्याच्या अवधीत ही कार्यशाळा उत्तमरीत्या पार पडली. प्रत्येकाने आणलेले वेगवेगळ्या कापडाचे, साडीचे अचूक माप घेऊन खडूनी मार्किंग करणे, कटिंग करणे, जोडणे, आणि याला हात शिलाईने सफाई देणे हे त्यांनी अतिशय सोप्या आणि सहज पद्धतीने शिकवले ते पण अप्रत्यक्षरित्या, म्हणजे हल्ली, भेटण्याचे एकमेव हक्काचे ठिकाण - 'झूम' वरून शिकवले.



साधारण दोन तास चाललेल्या या कार्यशाळेत सभासदांसोबत, मराठी विश्वचे सभासद नसलेल्या मंडळींनी सुद्धा नाव नोंदणी केली, जेणे करून त्यांना सुद्धा उपक्रमात भाग घेता आला. मंडळाच्या कार्यक्रमाची झलक कळण्यास नक्कीच मदत झाली.

स्वहस्ते तयार केलेल्या कलाकृतीचे आपल्याला नेहमीच कौतुक असते, आणि जेव्हा ती कलाकृती नवीन वर्षाच्या स्वागतासाठी, समृद्धीचे, उत्कर्षाचे, भाग्याचे आणि भरभराटीचे प्रतीक बनते तेव्हा केलेल्या कष्टाचे आणि धरलेल्या ध्यासाचे चीज झाल्यासारखे का नाही वाटणार?

भारतापासून देहाने दूर असलो तरी मेघाताईसारख्या मंडळींमुळे आपण मनोमनी भारतात जाऊन केव्हा पोहोचतो हे कळतच नाही. त्यांच्याकडे असलेल्या कलागुणांना स्वतःपुरतं न ठेवता, त्याचा वाटा सर्वांपर्यंत पोहोचवण्याच्या मनोदयामुळे ही गुढी वस्त्र बनवण्याची कार्यशाळा बऱ्याच जणांपर्यंत पोहोचू शकली. पुन्हा एकदा सौ. मेघाताई वनारसे यांचे मनापासून अभिनंदन आणि आभार, ज्यांच्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत बऱ्याच घरात नवीन वस्त्राने होणार आहे. या कार्यशाळेचा रेकॉर्डेड व्हिडिओ मराठी विश्वच्या यूट्यूब चॅनेलवर प्रकाशित केलेला आहे. ज्यांना जमेल त्यांनी नक्की जाऊन तो बघावा आणि अभिप्राय कळवावा.

https://www.youtube.com/watch?v=Cx8rJwVHJHY
सर्वांना गुढीपाडव्याच्या अनेक शुभेच्छा. हा लेख लिहिण्यास प्रेरित केल्याबद्दल मी सौ. शुभदा सावरगावकर आणि वाचल्याबद्दल वृत्त वाचकांचे मनापासून आभार मानते.

- **प्रिया गोडबोले,** एडिसन, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## खायके पान बनारस वाला


सप्टेंबर २०२४ मधली गोष्ट. बनारसच्या 'सुबह ए बनारस' सत्रात सकाळच्या गायनाचे आमंत्रण मला आले. त्यानंतर लगेचच बनारसच्या संस्कार भारती आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रातर्फे 'नाद यात्रा' कार्यक्रमासाठी गाण्याचे बोलावणे आले. फेब्रुवारी २७ आणि २८, २०२५ साठी हे दोन्ही कार्यक्रम ठरले. या दोन्ही कार्यक्रमांना पुण्याहून जाण्यासाठी विमानाची तिकिटे लगेचच काढली. तिकिट काढताना १३ जानेवारी ते २६ फेब्रूवारी २०२५ रोजी प्रयागराजमध्ये होणाऱ्या महा कुंभ मेळ्याविषयी मला काहीच माहिती नव्हती. त्याचप्रमाणे २६ फेब्रुवारीला महाशिवरात्र आहे ही पण कल्पना नव्हती.

जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात महा कुंभ मेळ्याविषयी एकेक बातम्या ऐकू यायला लागल्या. कोट्यावधी लोक प्रयागराजला जात आहेत आणि एक जागतिक विक्रम घडतोय हे दिसत होते. प्रयागराजला गेलेले सर्व लोक अयोध्या आणि बनारसला जात होते त्यामुळे बनारसमध्ये 'न भूतो न भविष्यती' गर्दी झाली होती. त्यातून २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्र होती. काशी विश्वनाथ दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक त्या दिवशी बनारसला जातात आणि त्याच दिवशी मी पुण्याहून बनारसला जायला निघालो. "जे काय होईल, ते होईल" या भावनेने मी बनारसच्या विमानतळावर उतरलो. हॉटेल वर जाण्यासाठी टॅक्सी मिळाली. जसजशी टॅक्सी शहराच्या जवळ आली तसा अफाट गर्दीचा अंदाज येऊ लागला. शहरात जाण्यासाठीचा रस्ता वाहनांसाठी बंद केला होता त्यामुळे बराच लांबचा रस्ता घ्यावा लागला. त्यात सुमारे दीड तास जास्त वेळ गेला. नंतर काही भाग हातात सुटकेस घेऊन चालत चालत जावे लागले. 'येन केन प्रकारेण' शेवटी हॉटेल पर्यंत पोचलो!

२७ फेब्रुवारीला दुपारी इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रात गेलो. तिथे केंद्राचे अध्यक्ष श्री. अभिजित दीक्षित यांनी केंद्राबद्दल खूप छान माहिती दिली. इथे गायन, वादन व नृत्य कलेशी संबंधित प्राचीन काळापासूनची खूप पुस्तके आहेत. संगीतावर संशोधन करणारे खूप अभ्यासक आहेत. भारताच्या इतिहासात संगीत शास्त्राविषयीचे जे पहिले पुस्तक लिहिले गेले त्याचे नाव आहे 'दत्तीलम'. मूळच्या संस्कृत पुस्तकावर आधारित इंग्रजी 'दत्तीलम' बघून मला खूपच आनंद झाला.


दुपारी ४ वाजता श्री. आनंद मिश्रा यांच्या तबला वादनाने 'नाद यात्रा' कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यानंतर माझे गाणे झाले. मी मुलतानी रंगात २ बंदिशी व त्यानंतर गोरख कल्याणमध्ये एक बंदिश आणि तराणा गायलो. नंतर महाशिवरात्र नुकतीच झाली होती म्हणून 'नागेंद्र हाराय' हे शिव पंचाक्षरस्तोत्र गायलो. साथीला बनारस हिंदू विद्यापीठामध्ये संगीत शिकलेले दोन गुणी कलावंत श्री. पंकज राय (तबला) आणि श्री. मोहित सहानी (हार्मोनियम) होते. त्यांच्या सक्षम साथीमुळे गायला खूप मजा आली. संयोजकांनी केलेले आदरातिथ्य सुंदर होते. बनारस शहराचे स्वरूप दाखवणारी एक कलाकृती आणि बनारसची खासियत म्हणून एक उपरणे मला भेट देण्यात आले.

त्यानंतर बनारस हिंदू विद्यापीठामध्ये संगीत विभागात कार्यरत असलेले प्राध्यापक अंबरीश चंचलजी मला त्यांच्या घरी भोजनासाठी घेऊन गेले. संगीताद्वारे रोग निवारण (Music Therapy) हा प्रा. चंचलजींचा जिव्हाळ्याचा विषय. 'Raag and Rhythm for Health' या मी व माझ्या सहकाऱ्यांनी चालू केलेल्या उपक्रमाशी ते पहिल्यापासून जोडले गेले आहेत. साहजिकच या विषयावर गप्पा गोष्टी झाल्या. आगामी कार्यक्रमांविषयी काही नवीन कल्पना पुढे आल्या. पुन्हा एकदा बनारसी पाहुणचाराचा खूप छान अनुभव मिळाला. पण दुसऱ्या दिवशी पहाटे गाण्याचा कार्यक्रम होता तेव्हा गप्पांना आवर घालावा लागला.



सुबह ए बनारस हा उपक्रम बनारसमध्ये गेली कित्येक वर्षे चालू आहे. अस्सी घाटावर गंगा नदीच्या काठावर, सूर्योदयाच्या आधी म्हणजे सुमारे ६ वाजता हा कार्यक्रम सुरु होतो. यावर्षी मला या कार्यक्रमात गायची संधी मिळाली ही भाग्याची गोष्ट. सकाळी ६ च्या आधीच मी अस्सी घाटावर जाऊन पोचलो. आकाशात पूर्व दिशेला गुलाल उधळायला सुरुवात झाली होती. सूर्यनारायण अजून अवतरले नव्हते. वातावरणात सुखद असा गारवा होता. अशा प्रसन्न अवस्थेत मी राग ग्यानकली मधील बंदिश "सीस धरन गंग" गायलो. ज्याच्या माथ्यावर गंगा आहे अशा शिव शंकराची स्तुती या बंदिशीत आहे. त्यानंतर एकीकडे सूर्योदय होत असताना "सूर्याष्टकं" हे स्तोत्र राग भैरव मध्ये

गायलो. कार्यक्रमाची सांगता "मंगल मूर्ती मारुत नंदन" या तुलसी दासजींच्या भजनाने केली. संत तुलसी दासजींचे वास्तव्य बनारस मध्ये होते. त्यांचे स्मरण करणे आवश्यक होते आणि तशी संधी मिळाली. साथीला आदल्या दिवशीचेच वादक होते. कार्यक्रमानंतर संयोजकांनी माझ्या व साथीदारांच्या डोक्यावर फुले उधळली. त्यांच्याकडून मिळालेले हे कौतुक अगदी अनपेक्षित होते! त्याचप्रमाणे एक प्रशस्ती पत्रक देऊन कलाकारांचा सत्कार झाला.




या मंगल कार्यक्रमानंतर तबला वादक श्री. पंकज राय यांनी बनारसचा खास 'लिंबू चहा' घ्यायचा आग्रह केला. तिथे लिंबू चहाची एक टपरी गेली कित्येक वर्षे लोकप्रिय आहे. तिथे गेलो. चहानंतर पानाचा आग्रह झाला. खरं म्हणजे सकाळी ८ वाजता पान आपण कधी खातो का? पण त्यांच्या आग्रहात मिठास होती. त्यांचे मन मोडता येईना. त्यामुळे "खायके पान बनारस वाला" चा कार्यक्रम झाला!

अशा जन्मभर लक्षात राहतील इतक्या सुंदर आठवणी घेऊन रात्री पुण्याला परतलो.

जाता जाता 'Raag and Rhythm for Health' बद्दल थोडं सांगतो. निद्रानाश, काळज्या, ताण तणाव, मधुमेह, रक्तदाब इत्यादी व्याधींवर उपाय म्हणून, केवळ समाज सेवा या भूमिकेतून, 'Raag and Rhythm for Health' हा उपक्रम १ जून २०२४ रोजी सुरु झाला. २० ते ३० मिनीटाचा Podcast दरमहा श्रोत्यांना WhatsApp मधून पाठवतो. श्रोत्यांना Podcast मधील संगीत ऐकून चांगले अनुभव आले आहेत. अधिक माहितीसाठी RaagAndRhythmForHealth@gmail.com या पत्त्यावर email पाठवा. धन्यवाद !

- **सुहास जोशी,** मोंटव्हील, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## मराठी भाषा विद्यापीठ आणि महानुभाव पंथ

महाराष्ट्र शासनाने २०२४ मध्ये काढलेल्या एका अधिनियमाद्वारे अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे महाराष्ट्रातील पहिले **'मराठी भाषा विद्यापीठ'** स्थापन करण्यात येत आहे. बहुसंख्य लोकांना ह्या विद्यापीठासंबंधी आणि स्थळाविषयी पुरेशी माहिती नाही. म्हणूनच त्याविषयीची तपशीलवार माहिती पुरवण्याचा हा प्रयत्न.

अर्थातच, ह्या विद्यापीठाचा मुख्य उद्देश मराठी भाषेचे जतन व संवर्धन करणे, विविध ज्ञानशाखांतील शिक्षण मराठीतून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यासाठी लागणारे संशोधन करणे हा आहे.

हे विद्यापीठ रिद्धपूरलाच का? रिद्धपूर हे महानुभाव पंथीयांची काशी म्हणून ओळखलं जातं. पण तितकंच महत्त्वाचं म्हणजे ही भूमी मराठी वाङ्मयाची काशी म्हणूनही ओळखली जाते. ह्याच पावन भूमीत म्हाइंभटांनी महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी ह्यांचं चरित्र सांगणारा 'लीळाचरित्र' हा मराठीतील पहिला गद्य ग्रंथ १३ व्या शतकात लिहिला. हा प्रामुख्याने त्यावेळच्या वऱ्हाडी भाषेत आहे. वऱ्हाडी ही मराठीतील सर्वात प्राचीन बोलीभाषा म्हणून ओळखली जाते. ह्या ग्रंथाच्या निर्मितीनंतर इतरही शेकडो ग्रंथ ह्या भूमीत लिहिले गेले. मराठी ही ह्या पंथाची धर्मभाषा होय. म्हणूनच मराठी भाषेच्या पहिल्या विद्यापीठासाठी रिद्धपूरपेक्षा दुसरी उचित जागा नाही. ह्या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून मराठी भाषेचे गाढे अभ्यासक डॉ. अविनाश आवलगावकर - जे मूळचे अमरावतीचेच आणि महानुभावपंथी आहेत - त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आता ह्या पंथाविषयी जास्त जाणून घेताना, ह्याचं मराठी भाषेच्या विकासाला मिळालेलं योगदान समजून घेऊया.

चक्रधर स्वामी हे मूळचे गुजरातमधले. त्यांचा जन्म गुजराती सामवेदी ब्राह्मण कुटुंबातला. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील काही घटनांमुळे ते देश पर्यटन करत असताना महाराष्ट्र प्रांतात आले व त्यांनी ११८५ मध्ये संन्यास दीक्षा घेतली व शिष्य संप्रदाय गोळा करून महानुभाव पंथाची स्थापना केली. हा पंथ स्त्री-पुरुष समानतेवर आधारित असून चातुर्वर्ण्य मानत नाही. ह्यात यज्ञादी कर्मकांडांचं स्तोम नाही. ह्यात जरी विष्णूचे दशावतार मानलेले असले तरी त्यांना चंद्राच्या कला असे संबोधण्यात येते. फक्त कृष्णावतार हीच पूर्ण कला अथवा पौर्णिमा असून कृष्णाला पूर्ण परमेश्वर असे मानण्यात येते. मांसाहार वर्ज्य असणाऱ्या ह्या पंथाचा प्रसार मांसाहारप्रेमी पंजाब ते अफगाणिस्तानपर्यंत झाला. पंजाबी लोकांच्या थोड्या रचना मराठीतही

आहेत. आजही काबूल सारख्या शहरात ह्या पंथाचे मठ आढळून येतात. असं असलं तरी तत्कालीन महाराष्ट्रातील परंपरागत, वैदिक व चातुर्वर्णाचा प्रभाव असलेल्या समाजात महानुभाव पंथाविषयी एक प्रकारची कटुता होती. सुरुवातीच्या काळात ह्या पंथात मूर्तिपूजा प्रचलित नसल्यामुळे ह्या संप्रदायाच्या लोकांनी विविध मुसलमान पातशाह्यांकडून मठस्थापनेसाठी सनदा मिळवल्या व मुसलमान राज्यकर्त्यांना त्यांच्या बाजूने वळवायचा प्रयत्न केला. ह्या राज्यकर्त्यांचा मूर्तिपूजेला विरोध होता. त्यामुळे त्यांना हा पंथ बहुसंख्यांच्या धर्मापेक्षा वेगळा वाटला. कदाचित त्यामुळेही असेल पण हा पंथ बहुसंख्य समाजाच्या द्वेषाचं कारण बनला.

सुरुवातीच्या काळात ह्या पंथाचे ग्रंथ हे मराठी भाषेत व बाळबोध लिपीत लिहिले गेले. सुमारे ६० वर्षांनी हे ग्रंथ एका सांकेतिक लिपीत लिहिले गेले. त्यास 'सकळी लिपी' असे म्हणतात. कालांतराने अशा ६-७ संकेत लिपी तयार झाल्या. त्या पुढीलप्रमाणे: सकळी, सुंदर, पारमांडल्य, अंक, शून्य, सुभद्रा आणि श्री. ह्या निरनिराळ्या लिपींचं प्रयोजन हे थोडं गुलदस्त्यात आहे. हा पंथ सर्वांपर्यंत पोहचवावा हाच चक्रधरांचा हेतू होता. म्हणूनच त्यांनी संस्कृतच्या ऐवजी मराठीतील ग्रंथ निर्मितीस चालना दिली. त्यांना मराठीविषयी नितांत आपुलकी होती. पण पुढे आपला धर्म व धर्मपुस्तके इतर धर्मातील लोकांना समजू नयेत म्हणून ही गुप्तता पाळण्यात येऊ लागली. त्यामुळे एक चांगला परिणाम असा झाला की कालपरत्वे मूळच्या ग्रंथांमध्ये फारसे शब्दबदल झाले नाहीत. पण एक दुष्परिणाम म्हणजे ह्या पंथाची मौलिक ग्रंथसंपदा जनसामान्यांपासून बराच काळ दडवली गेली.

प्रत्यक्ष चक्रधरांनी एकही ग्रंथ लिहिला नाही. पण त्यांच्या तोंडची मूळ वाक्ये केशवराज सुरी याने आचार्य-सूत्रे म्हणून 'सिद्धांत-सूत्रपाठ' ह्या ग्रंथात एकत्रित केली आहेत. हा ग्रंथ हे या पंथाचं मूळ तत्त्वज्ञान आहे. ह्या सूत्रपाठाची ११ प्रकरणे आहेत व १२ वे प्रकरण हे दृष्टांत म्हणून ओळखले जाते. ह्या पंथाचे अनुयायी ह्या सूत्रांचे नियमितपणे पठण करतात.

म्हाइंभट हा सारोळा येथे राहणाऱ्या एका विद्वान व श्रीमंत ब्राह्मणाचा मुलगा होता व त्याचा चक्रधरांबरोबरच्या वाद-विवादात पराभव झाल्यावर त्याने त्यांचे शिष्यत्व पत्करले. पुढे त्याने त्याच्या गुरुंच्या कथा — ज्यांना तो लीळा असं म्हणतो — त्या 'लीळाचरित्र' ह्या ग्रंथात लिहून काढल्या. त्यात एकूण १५०९ लीळा आहेत. म्हाइंभटाने चक्रधरांचे गुरु गोविंदप्रभू — जे महाराष्ट्रातील आद्य समाज सुधारक होते — त्यांचे चरित्र 'गोविंदप्रभुचरित्र' ह्या ग्रंथात शब्दबद्ध केले.

भास्कराचार्य हा अजून एक श्रेष्ठ महानुभावपंथी ग्रंथकार. त्याने 'शिशुपालवध' हा एक शृंगाररसप्रधान ग्रंथ लिहिला. त्यानंतर त्याने एकादशस्कंधटीका, पूजा-अवसर, चौपद्या, ईश-स्तुति, विरहाष्टक या सारखे पद्य ग्रंथ तर चक्रपाणिचरित्र, दत्तात्रयचरित्र, गीताटीका या सारखे गद्य ग्रंथ लिहिले. भास्कर कवीश्वर व्यास हा त्याच्या उत्तम काव्यरचनेमुळे व भाषाशैलीमुळे 'कवीश्वराचार्य' म्हणून प्रसिद्ध झाला. त्याचप्रमाणे महिंद्र व्यास हा ही एक श्रेष्ठ कवी होता.

नागदेवाचार्य हा चक्रधरांचा एक प्रसिद्ध शिष्य होता. पण त्याचा एकही ग्रंथ आज उपलब्ध नाही. त्याची मावशी महदंबा अथवा महदाईसा ही सुद्धा चक्रधरांना मानणारी होती. ती त्यांची सेवा-चाकरी करीत असे. तिचा जन्म जालना जिल्ह्यातील रामसगावचा. ही मराठीतील आद्य कवयित्री म्हणून फार थोड्या जणांना माहित आहे. पण हा मान निर्विवादपणे तिला जातो. बालविधवा ते संन्यासिनी ते कवयित्री हा तिचा प्रवास विलक्षण आहे. तिने एकंदरीत १४९ गीते रचली. ती 'धवळे' या नावाने प्रसिद्ध आहेत.

नरेंद्र पंडित, दामोधर पंडित, काशीनाथ व्यास, विश्वनाथ पंडित अशा कितीतरी प्रज्ञावंत महानुभावपंथीयांनी कथा, काव्य, चरित्र, भाषा विज्ञान, व्याकरण, लिपीशास्त्र ह्या सारख्या वाङ्मयप्रकारांची मराठीतून निर्मिती केली. ही यादी एवढ्यापुरती सीमित नाही. लक्षात घेण्यासारखी अभिमानाची गोष्ट अशी की ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी व मुकुंदराजाचा विवेकसिंधु ह्या जगप्रसिद्ध ग्रंथांच्या कित्येक वर्षे आधी तत्त्वज्ञानासारखे क्लिष्ट वाङ्मयप्रकार हाताळून मराठीने तिची प्रगल्भता कधीच सिद्ध केली होती. एवढंच नव्हे तर तिचा विस्तार पार अफगाणिस्तानपर्यंत होऊन धर्मप्रसाराची भाषा म्हणून ती विस्तृत प्रदेशात वापरली जात होती.

चिंतेची बाब ही आहे की आज आपल्याला मराठीच्या या वैभवशाली इतिहासाचा विसर पडलेला आहे. आपण उगीचच मराठीच्या सामर्थ्याविषयी शंका घेत असतो व आजच्या आधुनिक जगातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक संकल्पना पेलण्यासाठी मराठी सक्षम आहे का असे प्रश्न आपल्याला पडतात. मी आशा करतो की हा लेख वाचून आपल्या मनांतील मराठीविषयीचा न्यूनगंड दूर होण्यास मदत होईल. तसेच या प्रस्तावित मराठी भाषा विद्यापीठाच्या माध्यमातून मराठीला तिचे गतवैभव मिळण्यास नक्कीच उपयोग होईल.

- **अमित भावे,** गार्डन ग्रोव्ह, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## विठ्ठल - एक ऊर्जास्रोत



न्यू जर्सीच्या विठ्ठल मंदिरात भगवद्‌गीता अभ्यास वर्ग ऑक्टोबर २०२४ मध्ये सुरु झाला व गेल्या सहा महिन्यांत असे आनंददायी अनुभव आले की त्यातले काही आज आपल्यासमोर मांडावेसे वाटले.

२०२३ च्या मे महिन्यात मंदिर सुरु झाले तेव्हापासून सतत माणसे येत होती आणि हौसेने त्यांच्या लहान व टीनएजर मुलांनाही आणत होती. हायस्कूल आणि अंडरग्रॅड वयोगटातील मुले-मुली मोठ्या उत्सुकतेने सगळे पाहायची पण थेट सहभाग करायच्या वेळी थोडी बुजायची, अभंग गाताना जेव्हा गायक 'बोला पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' असे आवाहन करायचा तेव्हा आपल्याला नीट उच्चार करणे जमेल की नाही ह्या भीतीने गप्प राहायची पण ही मुले हौसेने येतात याचे कौतुक वाटायचे. त्यांना सहभागी होण्याचा विश्वास यायला काय करायला हवे ते मात्र लक्षात येत नव्हते.

आम्ही त्यांच्याशी संभाषण सुरु केले आणि हळूहळू ही मुले खुलू लागली. पाहता पाहता, जणू काही धरणाचे दार उघडल्यासारखे प्रश्नांचे पाट वाहू लागले. Why is our religion so complicated, why do we bow down to elders, why is aarti performed, why do we have so many gods, why do all our gods carry weapons, why do we present only red flowers to Ganesha आणि इतर अनेक. काही जाणकार वरिष्ठ व्यक्ती उत्तरे द्यायच्या पण बहुतांशवेळा बाण योग्य जागी पोचत नव्हता. ह्यावर विचार करता करता गीतेतील अनेक विचार डोळ्यासमोर येऊ लागले, उदाहरणार्थ 'पत्रं पुष्पं फलं तोयम्...' आणि असे वाटायचे की गीतेत तर श्रीकृष्ण स्वतः सांगतात की जो मला निष्पाप अंतःकरणाने पाने, फुले, फळे, साधे पाणी वाहील ते सुद्धा मी आनंदाने स्वीकार करेन. असे असताना आपल्या मुलांमध्ये एवढा गोंधळ का? आणि कृष्णाचे विठ्ठल हे रूप असे आहे की ज्याच्या हातात शस्त्र नाही, कशी पूजा करा व मला काय अर्पण करा ह्याचे काही नियम नाहीत आणि भक्ताचे रूप, रंग, जातपात कशाचे महत्व नाही. आणि ह्या मुलांशी नियमित संवाद साधण्यासाठी गीता अभ्यास सुरु करावा असे सुचले. आम्ही स्वतःलाच काही नियम घालून घेतले - संस्कृत वाचता न येणाऱ्या मुलांसाठी, श्लोक उच्चार वा पाठांतर अशा तऱ्हेच्या अपेक्षा न ठेवता, प्रत्येक श्लोक सखोलपणे शिकविण्याचा आग्रह न धरता, प्रत्येक अध्यायाचे मूळतत्व सांगणारे श्लोक निवडायचे व इंग्रजीतून, त्यांना रुचेल अशा भाषेत समजवायचे, जेणेकरून हे उपयुक्त आहे आणि आपण शिकावे अशी इच्छा आणि गोडी निर्माण व्हावी - आणि ऑक्टोबर २०२४ मध्ये हा वर्ग सुरु झाला.

आपण सगळे सहज कल्पना करू शकतो की हाय स्कूल व अंडरग्रॅड च्या मुलांना किती ॲक्टिव्हिटीज असतात, आणि शिवाय हँग आऊट ही करायचे असते, कधी कंटाळा ही येतो पण सहा महिन्यात कोणी मुलाने 'दांडी मारली' असे झालेले नाही हा आमच्यासाठी एक खूप आनंददायी अनुभव ठरला.

हळू हळू काहींचे आई-वडील, आजी-आजोबाही येऊ लागले आणि आम्हाला स्वामीनारायण प्रमुख स्वामींच्या एका सुंदर वाक्याची आठवण झाली 'family that prays together, stays together'.

सर्व मुलांनी एकत्र येऊन शिकावे व त्यांची कम्युनिटी बनावी म्हणून आम्ही रेकॉर्डिंग करून प्रकाशित करत नाही. एकतर रेकॉर्डिंग चालू आहे ह्या भावनेने अनेकांना प्रश्न विचारायला किंवा आपले मत व्यक्त करायला थोडे अवघड वाटते आणि दुसरे म्हणजे 'ठीक आहे, रेकॉर्डिंग येईलच, तेव्हा बघू' अशी सर्वांची भावना होते.

जशी मुलांची जाण वाढली तसे त्यांचे प्रश्नही बदलत गेले, विशेषकरून गीतेत वारंवार येणाऱ्या काही शब्दांविषयी! त्यांच्या काही संकल्पना होत्या किंवा त्या शब्दांचा अर्थ त्यांनी 'समानार्थी' इंग्लिश शब्दावरून लावला होता, जसे धर्म, कर्म, यज्ञ, मोक्ष इत्यादी. हे खूपच गोंधळविणारे ठरते हे आपण सर्वांना माहित आहे. आमच्याकडे सर्व उत्तरे तयार होती असे नाही पण त्यांची तर्काची कसोटी उत्तीर्ण होणारे तत्त्वच त्यांना समाधानकारक होईल हे लक्षात आले होते व आम्ही हे लक्षात ठेवूनच चर्चा करायचो. जसे ‘धर्म म्हणजे religion नव्हे’ हा पहिला धक्का असायचा त्यांच्यासाठी. तर तुमच्या प्रत्येक भूमिकेत तुम्ही कसे वागायचे त्याचे मार्गदर्शन करणारे ज्ञान दिले - जसे तुमचा पुत्रधर्म, मित्र धर्म, बंधू किंवा भगिनी धर्म, विद्यार्थी धर्म इत्यादी. मग आपल्या शिक्षकांचा आदर करणे हे आपल्या संस्कृतीत विद्यार्थ्यांचा धर्म मानले जाते हे सांगितले. हे त्यांना कुठेतरी स्पर्श करत होते हे आम्हाला कळत होते व खूप आनंद होत होता. दुसरी एक मोठी चर्चा झाली ती यज्ञाविषयी. बहुतांश मुले यज्ञ म्हणजे 'fire in a brick square and crazy smoke all over' असा विचार करत होती पण जेव्हा त्यांनी तिसऱ्या अध्यायातील १४, १५ आणि २२ हे श्लोक ऐकले आणि ते अचानक शाळेत शिकलेल्या 'water cycle' शी जुळले आणि आपली यज्ञ ही संकल्पना त्याच्याहून किती विशाल आहे हे लक्षात आले तेव्हा त्यांना जो आनंद झालेला पाहिला तो अवर्णनीय!

आणखी एक गमतीदार अनुभव म्हणजे 'वासांसि जीर्णानि' वर चर्चा करतानाचा, आत्मा एक शरीर टाकून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो हे काही पटेना! बोलता बोलता एक उदाहरण आले डोळ्यासमोर ते मोबाईल फोनचे. आपण आपला फोन बदलतो तेव्हा आपले कॉन्टॅक्टस, म्युझिक, मेसेजेस, आणि इतर गोष्टी कशा पुढल्या फोनमध्ये घेऊन जातो तसेच! आणि ते अगदी सहज पणे पटले.

हा वर्ग हायस्कूलर्स व अंडरग्रॅड विद्यार्थ्यासाठी असला तरी तो सर्वांसाठी खुला आहे व निःशुल्क आहे. हा वर्ग झूमवर आठवड्यातून एक दिवस एक तास दर मंगळवार रात्री ८ ते ९ (ईस्टर्न) ह्या वेळात सुरु आहे.

ह्याचबरोबर ६ ते १० वयोगटातील मुलांसाठी ‘बालसंस्कार’ वर्गही सुरु आहेत. अगदी 'वदनी कवळ घेता' पासून सुरु करतो व नित्य पठणातले श्लोक, गोष्टीरूपाने आपल्या परंपरेची ओळख असे शिकविले जाते. देवळातील एका कार्यक्रमात भोजनाची वेळ झाली व सर्व लोक जेवायला सुरुवात करणार तेवढ्यात एक चिमुरडीने सगळ्यांना दरडावले 'वदनी कवळ म्हटल्याशिवाय कुण्णी जेवायचे नाही'. तेव्हा आमच्या स्वयंसेवकांना त्यांच्या कष्टांची पावती मिळाली.
तिसरा शैक्षणिक उपक्रम आधुनिक जगातला - ‘स्टेम समर कॅम्प’. चौथीत व पाचवीत जाणाऱ्या मुलांसाठी आपल्या स्वयंसेवकांनी जुलै २०२४ मध्ये पूर्ण आठवड्याचा कॅम्प घेऊन अतिशय कल्पकरीत्या स्टेमचे वेगळे वेगळे विषय शिकविले. आदरणीय डॉक्टर माशेलकर ह्यांनी त्यात अजून एक भर घातली, ते म्हणाले STEM पुरेसे नाही, त्यात ‘A फॉर आर्टस्’ सुद्धा ॲड करायला हवा तरच मुलांचा सर्वांगीण विकास होईल आणि आम्ही ते शिरसावंद्य मानले. दिवाळीच्या आधी आपल्या काही स्वयंसेवकांनी दिवाळीचा किल्ला बनविण्याची कार्यशाळा घेतली. ते सगळे माती आणि रंगाने माखलेले कपडे, सगळ्या जुन्या आठवणी - मुलांनी जास्त एन्जॉय केले की आईवडिलांनी हे सांगणे अवघड होऊन बसले.

मंदिराची अधिक माहिती, गीता व बालसंस्कार वर्गात नाव नोंदण्यासाठी, न्यू जर्सी सारखेच इतर राज्यातही स्टेम समर कॅम्प करणे ह्यासाठी जरुर संपर्क साधा.
मंदिराचा व्हाट्सअँप नंबर ५५१.२४१.३५१९ (551.241.3519)
इमेल: namaste@vitthalmandirus.org
वेबसाईट: vitthalmandirus.org
मंदिर Newark विमानतळापासून अगदी २०-२५ मिनिटाच्या अंतरावर आहे, या बाजूला आलात तर अवश्य भेट द्या. जय हरी विठ्ठल

- **भाऊ कुलकर्णी**, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## परदेशातील वारी पंढरीची

जून-जुलै महिन्यात होणाऱ्या या वारी योगे आपल्याला "भक्ती, व्यायाम, आणि समाजसेवा" यांचा त्रिवेणी संगम अनुभवाची संधी मिळणार आहे!!

तुम्हाला माहीतच आहे की दरवर्षी देहू व आळंदी येथून हजारो वारकरी, आषाढी एकादशीच्या निमित्ताने, पंढरपूरच्या वारीला जातात. देहू/आळंदी ते पंढरपूर हे अंतर अंदाजे १५० मैलांचे आहे (अंदाजे २५० किलोमीटर) - हे अंतर वारकरी १९ ते २० दिवसात पूर्ण करतात.

यावर्षी आपणही वारीच्या दरम्यान जेवढे जमेल तेवढे अंतर तेवढ्याच कालावधीत (जवळजवळ तीन आठवड्यात) पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. ढोबळ मानाने दररोज २, ४, ६, किंवा ८ मैल चालले तर अनुक्रमे वारीचे २५, ५०, ७५, किंवा १००% अंतर पूर्ण होईल. कुटुंबातील मंडळी एकत्रितपणे चालूनही १००% अंतर पूर्ण करू शकतात. (उदाहरणार्थ: आई, वडील आणि दोन मुलांनी दररोज २ मैल चालले तरी एकत्रितरित्या वारीचे १००% अंतर पूर्ण होईल). माऊलींचा जप किंवा संतांचे अभंग ऐकत ऐकत चालताना किंवा धावताना ठरलेले अंतर कधी पूर्ण होते ते कळत पण नाही.

या वारीच्या निमित्ताने ‘समाजरंग’तर्फे आम्ही एक सामाजिक बांधिलकीचा प्रस्ताव घेऊन येत आहोत. यानुसार सहभागी होणारे प्रत्येक मंडळ एक किंवा त्याहून अधिक सामाजिक संस्था निवडू शकते आणि आपल्या मंडळातील मंडळींना या संस्थांना सढळ हस्ते मदत करण्याचे आवाहन करू शकते. वारीमध्ये भाग घेणाऱ्यांना ही मदत करणे बंधनकारक नाही आणि पूर्णपणे ऐच्छिक आहे

जर कुणी कमीत कमी $५० डॉलरची ऐच्छिक देणगी दिली, तर त्यांना एक टी-शर्ट तसेच विठोबा रुक्मिणीचे चित्र असलेले (३ इंचाचे) पदक मिळेल (जर जास्तीची देणगी मिळाली तर नक्कीच आवडेल). या टी-शर्टवर बृहन्महाराष्ट्र मंडळाचा, तसेच तुमच्या मंडळाचे मानचिन्ह (लोगो) असेल. तुमच्या शहरातील प्रायोजकांना या टी-शर्टवर मागील बाजूला जाहिरात करायची संधी आहे, ज्यायोगे त्यांनी दिलेला निधी पूर्णपणे टी-शर्ट आणि पदकांच्या खर्चासाठी वापरता येईल. ५०-१००% वारीचे अंतर पूर्ण करणाऱ्यांना बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे एक प्रशस्तीपत्रक पण देण्यात येईल. $१०० पेक्षा अधिक रकमेची देणगी देणाऱ्यांना, टी-शर्ट आणि पदक ठेवण्यासाठी एक छोटीशी खास पेटी देण्यात येईल.

नियमित व्यायाम केल्याने आरोग्याचे फायदे तर होतीलच, पण त्याचबरोबर एखाद्या सामाजिक उपक्रमाला हातभार लावल्याने मानसिक समाधान पण मिळेल. तरी जास्तीत जास्त लोकांना वारीमध्ये भाग घेण्यासाठी प्रवृत्त करा. सर्व मंडळे शनिवार, १४ जून रोजी एखाद्या मैदानात किंवा देवळात जमून विठू माऊलीच्या नामघोषाने वारीची सुरवात करू शकतात, तर वारीची समाप्ती रविवार, ६ जुलै रोजी आषाढी एकादशी होईल. बृहन्महाराष्ट्र मंडळाने सर्व मंडळांच्या अध्यक्षांना आवाहन केले आहे की त्यांनी कृपया ३० एप्रिल पर्यंत किती सभासदांना टी-शर्ट आणि पदके हवी आहेत ते प्रत्येक मंडळाने आम्हाला कळवावे तसेच निधीसंकलन ही करावे, त्यानुसार आम्हाला नियोजन करता येईल (पदके वेळेत मिळवण्यासाठी २ महिन्याचा कालावधी आवश्यक आहे).





## महाराष्ट्र कला महोत्सव

नमस्कार, मी भास्कर रानडे, महाराष्ट्र मंडळ, बे एरिया (MMBA)चा अध्यक्ष. आमच्या मंडळातर्फे सादर होणाऱ्या यशस्वी आणि लोकप्रिय अशा महाराष्ट्र कला महोत्सवाची सुरुवात कशी झाली आणि त्याचा विलक्षण प्रभाव सगळ्यांवर कसा पडला, याबद्दलची माहिती मी तुम्हाला सांगू इच्छितो.

२०२२ मध्ये, आम्ही एका कार्यक्रमाच्या संकल्पनेवर काम करत होतो पण आम्हाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. कार्यक्रमाची जागा निश्चित करणे आणि कलाकारांशी समन्वय साधणे यापासून ते सामंजस्य करार, तिकीटे आणि आयोजनाच्या सर्व पायऱ्या निश्चित करण्यापर्यंत अनेक अडचणी आल्या. पण काही महिन्यांच्या अथक प्रयत्नांनंतरही कार्यक्रम रद्द करावा लागला. दुर्दैवाने, ही कोणतीही अपवादात्मक घटना नव्हती, तर पूर्वी होत असलेल्या अशा संघर्षांचीच एक पुनरावृत्ती होती.

एका कार्यक्रमाच्या नियोजनासाठी तीन ते चार महिने लागायचे, त्यामुळे दरवर्षी केवळ काही निवडक कलाकारांच्या कार्यक्रमाचेच आयोजन करता येत असे. बे एरियामध्ये मराठी कलाकारांची अपार प्रतिभा असतानाही, या संथ गतीमुळे आम्ही एखाद्या कलाकाराला संपूर्ण दशकात फक्त एकदाच संधी देऊ शकत होतो, त्यामुळे त्यांच्या उमेदीच्या काळातील 'सर्वोत्कृष्ट वर्षां'तील कला अनुभवण्याची संधी आम्हाला आणि प्रेक्षकांना गमवावी लागत होती. हे आम्हाला आणि प्रेक्षकांना तीव्रतेने जाणवत होते. प्रचंड ऊर्जा आणि संसाधने गुंतवूनही, प्रेक्षकांची उपस्थिती अपेक्षेपेक्षा कमीच राहायची—प्रत्येक प्रयोगाला फक्त ८०-१०० प्रेक्षक असायचे. त्यातच, कलाकारांसाठी धोरणेही कठोर होती—मंडळाचे सदस्यत्व घेणे, तिकिटे विकणे किंवा खरेदी करणे यासह काही अतिरिक्त बंधने होती. अध्यक्ष म्हणून या सर्व बाबींचे प्रत्यक्ष व्यवस्थापन करताना मला जाणवले की हा दृष्टिकोन ना कलाकारांसाठी अनुकूल होता, ना दीर्घकाळ टिकणारा.

या जाणीवेने २०२२ च्या शरद ऋतूमध्ये महाराष्ट्र कला महोत्सवाने (एमकेएम) जन्म घेतला. परिस्थिती बदलण्याचा निर्धार करून, आम्ही संपूर्ण आठवडाभरासाठी कार्यक्रमाची एक जागा निश्चित केली आणि शुक्रवार ते रविवार सलग कार्यक्रमांचे आयोजन केले. आमच्या प्रक्रियेत सुरळितपणा आणण्यासाठी, आम्ही योग्य सामंजस्य करार केले, प्रचार साहित्य तयार केले, कलाकारांसाठी भव्य रेड-कार्पेट स्वागत आयोजित केले, योग्य मोबदला दिला, आणि कार्यक्रमाचे काटेकोरपणे आयोजन केले, ज्यात आदरातिथ्य आणि भोजन सेवा समाविष्ट होत्या. याचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि महाराष्ट्र कला महोत्सवाला अभूतपूर्व यश प्राप्त झाले. त्यानंतर, हा महोत्सव दरवर्षी अधिकाधिक वृद्धिंगत होत गेला आणि बहरत गेला.

गेल्या काही वर्षांत, आम्ही महाराष्ट्र कला महोत्सवाचे पाच वेळा आयोजन केले आहे. यात शास्त्रीय आणि सुगम संगीत, नृत्य, वाद्य सादरीकरण, स्टॅंड-अप कॉमेडी, कीर्तन, नाट्य आणि मराठी व बॉलीवूड संगीत असलेले ऑर्केस्ट्रा अशा ३५ अनोख्या कार्यक्रमांचा समावेश आहे.

या महोत्सवांद्वारे, आम्ही प्रत्येक आवृत्तीत १०० हून अधिक कलाकारांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, ज्यामध्ये तरुण उदयोन्मुख प्रतिभावंत कलाकार, बे एरियामधील ज्येष्ठ कलाकार आणि नवीन कलाकारांचाही समावेश केलेला आहे.

महाराष्ट्र कला महोत्सव-३ पासून आम्ही प्रत्येक वार्षिक कार्यक्रमात बे एरियाबाहेरील किमान एका मंडळाचा समावेश करण्याची बांधिलकी स्विकारली आहे. आम्ही फिलाडेल्फिया, सिएटल

आणि कॅनडा येथील मंडळांच्या कार्यक्रमांचे साभिमान आयोजन केले आहे, त्यामुळे उत्तर अमेरिकेतील मराठी कलाकारांना पाठिंबा देण्याचे आमचे उद्दिष्ट सफल झाले आहे.

स्थानिक लोकांनी आपल्या माणसांना एकत्र आणण्यासाठी आणि त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी आपापल्या प्रदेशांत महाराष्ट्र मंडळे स्थापन केली आहेत - मग ते बे एरिया, सिएटल, लॉस एंजेलिस, फिलाडेल्फिया, न्यू जर्सी, डलास, ओहायो असो, किंवा आणखीन पलीकडे! मी सर्व मंडळांच्या अध्यक्षांना विनंती करतो की त्यांनी त्यांच्या स्वतःच्या समुदायातून आणि संपूर्ण उत्तर अमेरिकेमधून होतकरू कलाकारांना शोधून काढावे. तुम्हाला आश्चर्य वाटेल की किती प्रतिभावंत कलाकार स्वतःला व्यक्त करण्याच्या एका संधीची वाट पाहत आहेत!

प्रत्येक महाराष्ट्र कला महोत्सव हा एक उत्कृष्ट कार्यक्रम ठरला आहे, याचा मला खूप अभिमान आहे. प्रत्येक कार्यक्रमात १०० हून अधिक कलाकार भाग घेतात आणि तीन दिवसांत जवळपास १००० प्रेक्षकांना आकर्षित करतात. कलाकार आणि प्रेक्षकांकडून मिळालेला प्रचंड प्रतिसाद आणि उत्साहामुळे आमच्या प्रयत्नांना बळकटी मिळाली आहे.

पुढे पाहायचे झाले तर, सप्टेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र कला महोत्सव-६ ची आमची तयारी आधीच सुरू झाली आहे आणि आम्ही २०२६ च्या वसंत ऋतूत होणाऱ्या कला महोत्सवासाठी जागा नियोजित करून राखून ठेवली आहे.

सर्वप्रथम, हे सर्व शक्य झाले आहे, एका समर्पित आणि कार्यप्रवण कार्यकारी समितीमुळेच! माझ्या संघात असे क्रियाशील लोक आहेत ज्यांनी प्रत्येक क्षणी पुढे येऊन काम केले आहे. हे माझे भाग्यच आहे. आमचे कार्यक्रम घड्याळाच्या काट्यांवर चालतात - ते वेळेवर सुरू होतात, वेळेवर संपतात. कलाकारांपासून ते प्रेक्षकांपर्यंत सर्वांचे स्वागत केले जाते. कार्यकारी समितीच्या सेवाभावी वृत्तीमुळे आणि कार्यक्षमतेमुळे कार्यक्रमाच्या प्रत्येक पैलूची काळजी घेतली जाते—सजावट, भोजन व्यवस्था, रसद! पण इतके कार्यक्रम चालवण्यासाठी एकटी समिती पुरेशी नाही. म्हणूनच प्रत्येक कार्यक्रमासाठी, आपणहून पुढे येणाऱ्या स्वयंसेवकांच्या रूपाने आम्हाला खरोखरच एक आशीर्वाद मिळाला आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही! एक संघटना म्हणून, आम्हाला केवळ यश मिळाले नाही, तर आम्ही मजाही केली, आमच्यात मैत्रीचे नाते निर्माण झाले आणि खऱ्या अर्थाने आमचे एक सुंदर कुटुंब बनले. आपल्या समुदायात आता मजबूत बंध निर्माण झाले आहेत! आता सर्व कामे आपसूक आणि सूत्रबद्ध चालतात जणू स्वयंचलित पूर्वनियोजन असावे अशी. हा संपूर्ण प्रवास कसा उलगडला आहे हे पाहणे विस्मयकारक आहे. लोक आता फक्त महाराष्ट्र कला महोत्सवाची वाट पाहत नाहीत तर ते स्वयंसेवक संघाचा भाग बनण्यासाठी आणि हा सगळा अनोखा अनुभव घेण्यासाठी उत्सुक असतात.

माझ्या चमूचे, माझ्या स्वयंसेवकांचे आणि आमच्या समुदायाचे तुमच्या अढळ पाठिंब्याबद्दल आभार.

- **भास्कर रानडे,** अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ बे एरिया

## अक्षय दान

सालाबाद प्रमाणे या वर्षीही मी, माझी कॉलेजची सगळी कामे उरकून आजीकडे गावी चालले होते. तसे कधीकधी आईबाबा पण यायचे. नेहमीच्या कामाच्या व्यापात त्यांना नेहमीच जमायचे असे नाही. यावर्षी मी एकटीचं आजीकडे गावी चालले होते. एवढं सांगायचे कारणही तसेच आहे. प्रत्येक वर्षी आजी अक्षय्यतृतिया अगदी थाटामाटात साजरी करायची अर्थातच तेव्हा तिला आम्ही सगळेच तिच्या बरोबर हवे असायचो. अगदी वसंतपंचमी पासून आजीचे अक्षय्यतृतियेच्या तयारीचे व्यवस्थापन सुरू व्हायचे.



अक्षय्यतृतिया, साडेतीन मुहूर्तापैकी एक. या दिवशी केलेल्या गोष्टी अक्षयपणे आपल्या जवळ राहतात. एखाद्या नवीन गोष्टींची सुरवात, एक का अनेक असे बरेच काही या दिवसाशी निगडीत आहे.

आजीच्या उत्साहानेच या दिवसाचे महत्व आमच्या घरी निर्माण होऊन दरवर्षी त्यात काकणभर वाढच होत आहे. मागच्या वर्षीची आठवण आहे. माझी परीक्षा होती म्हणून अगदी अक्षय्यतृतियेच्या सकाळी पोहोचले तर गावातल्या काही लोकांच्या मदतीने आजीने सगळं घर झेंडूची फुले, आंब्याची पाने यांच्या माळांनी सजवले होते. पूजेची सगळीच तयारी करून ठेवली होती. चौरंगावर कलशामध्ये पाणी, आंब्याची पाने ठेऊन त्यावर नारळ ठेवला होता. पाठीमागे विष्णुलक्ष्मीची मूर्ति, त्यांच्या पुढे आंब्याची आरास, तसेच सजवलेले पाण्याचे माठ. सगळी पूजेची तयारी झालेली होती आणि आजी माझीच वाट पाहत होती. मी आल्यावरच पूजा झाली. पितरांना तर्पण झाले आणि नेहमी प्रमाणे आमच्या शेतावर काम करणाऱ्या सगळ्यांनाच आमरसाचे जेवण झाले.

आता मी गाडीत बसून प्रवास करताना सगळे डोळ्यासमोर दिसत होते. तसे या वर्षी मी २-३ दिवस अगोदर जात होते तर अगदी पहिल्यापासूनच मला यावेळी आजीला मदत करता येणार होती. असा विचार करताना सहजच एक विचार डोक्यात आला. आमच्या घरचे काय की बाकीच्या घरातले काय, सगळेच पुरातन काळापासून जे अक्षयतृतियेचे महत्व सांगितले आहे ते स्मरुन तो दिवस जसा सांगितला तसा साजरा करतात. पण हे अक्षय दान, त्याचे जे महत्व सांगितले ते आताच्या काळानुसार कसे करता येईल. विचार तर चालू होता पण निटसे काही डोळ्यांसमोर येत नव्हते. शेवटी विचाराअंती ठरवले की आजीबरोबरच तर्कवितर्क करु. थोड्याच वेळात गाडी गावाच्या स्टँडवर आली आणि मग तिथून घरी त्याच विचारात चालत आले. दारातच आजी उभी होती. लांबूनच तिची हसरी मूर्ति पाहून खूपच छान वाटत होते.

आल्या आल्या आजीने छान गरम चहा दिला आणि त्यामुळे अजूनच तरतरी आली. मग चहा घेता घेता मगाच पासून मनात घोळत असलेला विषय आजी समोर मांडला. ते सगळे ऐकून आजी छानशी हसली, म्हणत की तुझ्या याच विचाराची मी वाट पाहत होते. आता ऐक, अक्षय या शब्दाचा अर्थ कधीही कमी न होणे. त्यामुळे या दिवशी कोणतेही जप, यज्ञ, पितृ-तर्पण, दान -पुण्य केल्याने होणारे लाभ कधीही कमी होत नाहीत. तुझ्या आजोबांनीच एक प्रथा सुरू केली होती अगदी तुझे बाबा शाळेत होते तेव्हापासून. अक्षय्य तृतीया या दिवसापासून थोडे थोडे उन, वातावरणात उष्मा वाढत जातो तेव्हा तुझ्या आजोबांनी शेतातल्या कामगारांसाठी पाणपोयी सुरू केली. आता तू म्हणशील त्यात काय एवढे, तर पूर्वी आपल्या भागात पाण्याची खूप टंचाई होती, तेव्हा ही पाणपोयी त्या कामगारांसाठी सुखाची लहर घेऊन आली होती. पुढे पाणपोयी साठी पाण्याची अखंड सोय होणे गरजेचे होते, तेव्हा अत्यंत महत् प्रयासाने आजोबांनी गावात पाण्याचे नळ आणले. तेव्हा पासून आपण प्रतिकात्मक स्वरूपात पाण्याच्या माठाची पूजा करतो. हे ऐकताना मला पुजेतल्या सजवलेल्या माठांची आठवण झाली. मी आजीला म्हणाले की मग मला अगोदर का नाही सांगितले, तर म्हणते कशी सगळे मनापासून करावेसे वाटले तेव्हाच त्याचे महत्व कळते. कृष्णाने युधिष्ठिराला सांगितले होते की, या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही, म्हणूनच हिला अक्षय्य तृतीया असे म्हणले आहे.

सगळे ऐकून मला आजी आणि आजोबांचा खूपच आभिमान वाटला. आपण पण त्यांचे अनुकरण करायचा प्रयत्न करु असे मनापासून वाटायला लागले होते. या सगळ्या विचारात या वर्षीच्या पुजेची तयारी, त्याच्या अनुशंगाने असलेली कामे हे सगळे करण्यात एक वेगळाच उत्साह आला होता. सजवलेल्या पाण्याच्या माठांकडे मी इतक्या प्रेमाने कधी पाहिले नसेल. आजीला पण सगळे सांगितल्यामुळे एक वेगळाच उत्साह आला होता.

पूजा सगळी विधीपूर्वक संपन्न झाली. नेहमी प्रमाणे आमरसाचे जेवण पण झाले. सगळे आवरे पर्यंत दिवस कधी संपला ते कळलेच नाही. दुसऱ्या दिवशी सकाळीच मला निघायचे होते. रात्री झोपायच्या अगोदर मी आजीला म्हणाले की मला तुला काही सांगायचे आहे, आजीच्या चेहऱ्यावरचे आश्चर्य स्पष्ट दिसत होते, पण सरसावून ऐकायला बसली.

मी म्हणाले की मला पण आजोबांसारखे करायचे आहे पण आता या क्षणी जेव्हा मी पण अजून शिकत आहे तर मी माझा वेळ गावातल्या लोकांसाठी देऊ शकते, त्यांना वेगवेगळ्या विषयांची माहिती देऊ शकते. त्यावर आजी झटकन म्हणाली बर, मग पुढे काय ? म्हणजे तुझे शिक्षण झाल्यावर नंतर काय? जे जमते तेच करावे. त्या क्षणी मला पुढे काय या बद्दल नक्की सांगता येत नव्हते पण एक गोष्ट निश्चित होती तो म्हणजे माझा संकल्प जो आजीच्या सांगण्याने दृढच होत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी परत जायला निघाले , निघताना आजीला सांगितले की या पुढचे सगळे रविवार मी इथे येणार आणि काल म्हणल्याप्रमाणे दर रविवारी सकाळी माझा वेळ तुझ्यासाठी, गावातल्या लोकांसाठी, मग करता करता अजून काय करता येईल त्याची कल्पना येईलच, आणि तू आहेसच की मार्गदर्शन द्यायला. आजीच्या डोळ्यात पाणी तरळले होते नकळत तिची दृष्टी आजोबांच्या फोटोकडे गेली होती.

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## महाकुंभ २०२५- प्रयागराज

१३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या काळात प्रयागराजला महाकुंभ होत आहे व हा दुर्मिळ योग १४४ वर्षातून एकदा येतो हे कळल्याबरोबर मी तिथे जायचे ठरवले व ताबडतोब मुंबईचे तिकीट बुक करून टाकले. माझ्यासारख्या FOMO (fear Of Missing Out) personality ला तिथे न जाऊन कसं चालले असते?

मग तिथे जाण्यासाठी कोणीतरी साथीदार शोधायला लागले. तशी मी नेहमी एकटी ट्रॅव्हल करत असते; पण कुंभमेळयाची गर्दी व जत्रेत हरवलेली जुळी भावंडे हा वर्षानुवर्षे पाहत आलेला बॉलीवूडचा आवडता प्लॉट आठवला व वाटले जरी आपल्याला जुळं नसले तरी आपले अस्तित्व हरवायला नको. कोणीतरी बरोबर असायला पाहिजे. जराशी आजूबाजूला चौकशी केली (आजूबाजूला म्हणजे आमच्याच कॉम्प्लेक्समध्ये). तर चक्क १३ जण केसरी टूर्सबरोबर तिथेच जाताहेत ही माहिती कळली. सॉलिड योगायोग जुळून आला होता. अगदी बॉलीवुड फिल्मस्  सारखा. लगोलग केसरीशी संपर्क साधून टूर बुक करून टाकली व जरा अजून पुण्य गाठीशी असावं म्हणून टूर संपल्यावर आणखी दोन दिवस प्रयागराजला राहायचे ठरवले.

टूर डिरेक्टरने बजावल्याप्रमाणे ८ फेब्रुवारीला सकाळी ६ वाजता सगळेजण मुंबइ एअरपोर्टला भेटलो आणि अविस्मरणीय यात्रेचा पहिला चरण सुरु झाला.

खरं म्हणजे काशी प्रयागराज यात्रा करायचे वय आहे का माझं? आणि, मानसिकता तरी आहे का? पण, ही यात्रा करायची माझ्या आजीची खूप इच्छा होती पण दुर्दैवाने ती पुरी होऊ शकली नाही कारण तिला पॅरालिसीस झालेल्या माझ्या आजोबांची शेवटपर्यंत काळजी घ्यायला लागली. माझं बालपण आजीकडे गेलं. मी तिलाच आई म्हणायचे. आजोबा गेल्यावर मी खरं तर तिला घेऊन जाऊ शकले असते, पण ते मला सुचलंच नाही. अनेक वर्ष ती रुखरुख मनात सलत होती. त्यामुळे मी ही यात्रा ‘आजी के नाम’ करून टाकली.

पहिला स्टॉप लखनऊ, नंतर अयोध्या. श्रीराम दर्शनानंतर पुढचा स्टॉप होता प्रयागराज व संगमात डुबकी. पण नेमक्या त्याच दिवशी पंतप्रधान मोदीजींनी संगमात डुबकी मारायचे ठरवले. आता त्यांना कोण नाही म्हणणार? आले मोदीजींच्या मना, तिथे कोणाचे काहीही चालेना. संगमाच्या आजूबाजूचे संपूर्ण प्रयागराज बंद झाले. आम्हाला हॅाटेलमध्ये पोचता पोचतादेखील नाकीनऊ आले. पण एक चांगले झाले. दुपारच्या ऐवजी दुसऱ्या दिवशी सकाळी संगमावर जाऊन डुबकी मारायची वेळ ठरली.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे चार वाजता सगळेजण हॅाटेलच्या लॅाबीमध्ये भेटलो व वेगवेगळ्या रिक्षा करून यमुनेच्या पात्रापाशी गेलो. सगळ्या रिक्षा येता येता सकाळचे झुंजूमुंजू झाले होते. मग तीरावरून खाली उतरून ठरवलेल्या बोटीपाशी गेलो व दर बोटीत आठजण असे करत आमचा केसरी ग्रुप संगमावर पोचला.

ती यमुनेतील नौका सहल विलक्षण रम्य होती. हवेत सुखद गारवा होता. आकाश किलबिल करणाऱ्या पक्षांनी भरून गेलं होतं. पूर्व दिशा लालेलाल झाली होती. होड्यांचे ताफेच्या ताफे त्याच दिशेने जात होते. थोड्या वेळाने सूर्योदय झाला. सूर्याची किरणे यमुनेवर पडून पात्र चमचमायला लागली. ‘चमचम करता था वो नशीला चमन!’ आम्ही आमच्या नावाड्याला बोलते केले. त्याचे नाव होते राजू निषाद. मला एकदम आठवले - रामायणात जेव्हा राम, सीता आणि लक्ष्मण शरयू नदी पार करून जात होते तेव्हा निषादराज नावाच्याच नावाड्याने त्यांना शरयू पार करुन दिली होती. ते ऐकून आमचा राजू नावाडी अभिमानाने म्हणाला “सगळ्या उत्तरप्रदेशमधल्या नद्यांमध्ये युगानुयुगे फक्त आमच्या निषाद जमातीचेच लोक काम करतात. इतर कोणालाही होडी वल्हवायची परवानगी नाही”.  त्यांची टोटल मोनोपली  होती. योगीजी म्हणाले देखील होते की या कुंभमेळ्यात नावाड्याने लाखो रुपये कमावले.

दुसऱ्या दिवशीच्या गंगारतीला गंगा नदीतल्या नावाड्याला आम्ही बोलते केले व तो हेच म्हणाला "सगळया नद्यांवर आमचीच मक्तेदारी आहे आणि हे मोदीजींनीच ठरवून दिलेले आहे." आणि गमतीची गोष्ट म्हणजे, तरीदेखील ह्या निषाद समुदायापैकी कोणीही मोदीजींना लोकसभा निवडणुकीत मत दिलं नव्हतं. त्यानेच सांगितले आम्हाला हे. महा आश्चर्याने का म्हणून विचारल्यावर तो म्हणाला " उद्या मोदीजी जर स्पीड बोटी घेऊन आले गंगेवर तर? आमचा सगळा धंदा बसेल ना? ते कधीही काहीही करु शकतात." मी विचारले "अरे, पण आत्ता त्यांच्यामुळेच तुम्हाला पैसे मिळताहेत ना? हा कृतघ्नपणा नाही का? हे तुमचे कृत्य म्हणजे त्यांच्या पाठीत खंजीर खुपसल्या सारखं नाही का?" तो खांदे उडवत निघून गेला. मोदीजींची Constituency असलेल्या पवित्र काशीनगरीत कृतज्ञता आणि कृतघ्नपणाच्या व्याख्यांमध्ये खूपच घोळ दिसत होता.

Back to Yamuna boat-ride now. राजू नावाडी म्हणाला, "यमुना खोल आहे म्हणून काळी दिसते पण गंगा खळखळणारी आहे व त्या मानाने उथळ आहे म्हणून ते पाणी शुभ्र दिसतं". आम्ही जेव्हा संगमावर आलो तेव्हा दोन्ही पाण्यामधला फरक अगदी स्पष्ट दिसत होता. राजू नावाड्याने बोट धक्क्याला लावली. तिथे अनेक धक्के होते. प्रत्येकाच्या ऐपतीप्रमाणे व सामाजिक प्रतिष्ठेप्रमाणे धक्के बांधले गेले होते. केसरीने ठरवलेला आमचा धक्का संगमाच्या मध्ये होता. तो मिडल क्लास धक्का होता हे सांगण्याचीही जरुर नव्हती. लांबूनही कळत होता. जरा पुढे किनाऱ्याला लागून VIP, VVIP, Celebrity धक्के दिमाखात उभे होते. त्यांच्या मागे पार्क केलेल्या त्यांच्याच SUV गाड्या देखील डौलात चमचमत होत्या. त्या गाड्यांच्या मालकांना बस, रिक्शा, बोट अशी त्रिविध यात्रा करायची जरूर नसणार.  Airport ते SUV ते धक्का ते संगम डुबकी ते

चेंजिंग रुम ते SUV & back to Airport असा सुखद प्रवास असणार बहुधा.

असो. आम्ही सगळे बोटीतून धक्क्यावर उतरुन पाण्याच्या दिशेने गेलो. राजू नावाडयाने आम्हाला कुठे खोल, कुठे उथळ पाणी आहे हे सांगितले. मला संपूर्ण डुबकी मारायची होती. काहींना नुसते पाय बुडवायचे होते. मी आणि अजून दोघीजणी खोल पाण्याच्या दिशेने गेलो. मनसोक्त पाण्यात डुंबलो. पाणी अतिशय स्वच्छ होते. Crystal clear. कसलाही वास नाही. काहीही तरंगत नव्हत. त्या पाण्यात नक्की काहीतरी Magical, Mystical होते. शरीराला लागल्याबरोबर संपूर्ण शरीरातून शिरशिरी गेली. मी भाविक आहे म्हणून केवळ मलाच अस वाटले असे अजिबात नाही. एक डेट्रॉइटची मैत्रीण बरोबर होती. आयुष्यातल्या काही अनुभवांमुळे जरा कमी विश्वास असणारी. तिने फक्त पाण्यात पाय बुडवायचे एवढेच ठरवले होते. पण काही कळायच्या आत तिने नखशिखांत स्वतःला बुडवून घेतले. तिथली एनर्जीच वेगळी होती. उगीच नाही भारतातल्या, जगातल्या, सगळ्या स्तरावरच्या ६६ कोटी माणसांनी त्या पाण्यात उतरुन डुबकी मारली. स्नान करून ती एनर्जी अनुभवली.



मनसोक्त डुंबल्यावर आम्ही बाहेर आलो. ते स्नान इतके Exhilarating होते की बाहेर आल्यावर मी अत्यानंदाने थरथरत होते! त्यामध्ये Makeshift changing rooms केल्या होत्या, दोन साड्या एकत्र बांधून आमच्यासाठी. मात्र त्या फटीत शिरुन पाण्यामुळे अंगाला चिपकून बसलेले ओले कपडे काढणे हे मात्र महाकर्मकठीण काम होते. चक्क ओरबाडून काढायला लागले व बॅगेतले कोरडे कपडे घातले. पावन होऊन परत बोटीत येऊन बसलो. त्यानंतरचा सबंध दिवस आम्ही आंघोळ न करता तशाच वावरत होतो. नाहीतर स्विमींग पूल वा बीचवरुन आल्यावरही आपण परत आंघोळ करतो. तरीही कुठे पुरळ नाही, खाज नाही, वास नाही. पाणी अतिशय शुध्द होत याचीच ग्वाही नाही का ही?

NASA ने शोधून काढायच्या कित्येक शतके आधी, प्राचीन भारतातल्या हिंदू ऋषींनी शोधून काढले होते की सगळे ग्रह आपापल्या कक्षेत सूर्यापासूनच्या अंतरानुसार सूर्याभोवती प्रदक्षिणा घालतात. गुरु ग्रहाला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा घालायला बारा वर्ष लागतात. ती प्रदक्षिणा संपवून जेव्हा सूर्य व गुरु एका राशीत येतात तेव्हा कुंभमेळा साजरा केला जातो. शतकानुशतकांपासून हे घडत आले आहे. असे बारा कुंभ झाल्यानंतर येणाऱ्या कुंभाला महाकुंभ म्हणतात. एक पीढी जर वीस वर्षाची धरली तर आपल्या आधीच्या सात पिढ्यानी हे बघितलेले नाही व नंतरच्या सात पिढ्या हे बघणार नाहीत. इतकी ही एकमेवाद्वितीय घटना आहे. समुद्रमंथनाचा व महाकुंभचाही संबंध सांगितला जातो. महाकुंभच्या वेळी समुद्रमंथनात आले तसेच अमृत समुद्रतळातून बाहेर येते व संगमाच्या पाण्यात मिसळले जाते म्हणून एक डुबकी मारली तरी सात जन्माचे पुण्य लागते, अशी धारणा आहे..

नंतरच्या दिवशी केसरी टूर तर्फे पहाटे वाराणसीच्या काशी विश्वेश्वराचे दर्शन व संध्याकाळी गंगा आरती झाली. दुसरे दिवशी सारनाथची सफर करून ती मंडळी परत गेली. आम्ही दोघी मात्र अजून दोन दिवस प्रयागराजमध्ये राहिलो. पण तोवर तिथे इतकी प्रचंड गर्दी झाली होती की उ.प्र. पोलिसांनी गाडया आत आणायला मनाई केली. गाडया शहराच्या सीमेच्या २० किमी लांब उभ्या करायचे आदेश दिले. त्यामुळे नंतर दोन दिवस राहूनही आधीपेक्षा अधिक लाभ आम्हाला घेता आला नाही. मात्र आम्ही पहाटे तीन वाजता पायी चालत संगमावर जाऊन आलो. आम जनतेबरोबर सामावून एकत्र पायी चालत जाणे हाही एक वेगळा अनुभव होता. कोण कुठून आले आहे, कुठच्या पदावर आहे, पूर्वायुष्य काय आहे ह्या पैकी कसलाही संबंध नव्हता. सगळ्यांच्या मनात फक्त एकच पावन पवित्र भावना होती, जी सगळ्यांना जोडत होती.

दर १४४ वर्षांनी भारतात घडणारी महाकुंभमेळ्यासारखी अभूतपूर्व पर्वणी अमेरिकेत राहूनही 'याचि देही याचि डोळा' अनुभवायची संधी मिळाली ह्याबददल मी त्या अगाध शक्तीची मनापासून ऋणी आहे. कधी कधी वर्षानुवर्षे प्लॅनिंग करुनही काही संधी हातच्या निसटून जातात तर कधी सगळं सुरळीत पार पडते, जसं ह्यावेळेला घडलं.

मला खात्री आहे की माझ्या आजीचा ह्यात खूप मोठा वाटा होता. तिला हे अनुभवायच होत ना! संपूर्ण यात्रेत तिचे माझ्यासोबत असणे मला जाणवत होते. जे सुख जिवंतपणी तिला मिळाले नाही त्याचा माझ्या डोळ्यातून आस्वाद घेणं कळत होतं. She was living vicariously through me. नश्वर देह जळल्यावर आपल्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्तिची एनर्जी नाहीशी होते यावर माझातरी अजिबात विश्वास नाही. ज्यांनी ती एनर्जी माझ्यासारखी अनुभवली असेल त्यांना नक्कीच पटेल माझे मत! Soul is immortal! कुंभमेळ्यातले स्नान आत्म्याच्या पावित्र्यासाठीच करायचं असतं ना !

**- डॉ. मीना नेरुरकर, न्यू जर्सी**

## वाढदिवस

आपण समोरच्या व्यक्तीला सकाळी सुप्रभात, good morning, नमस्ते, राम राम असे म्हणतो. प्रत्यक्ष भेटल्यावर म्हणतो, फोनवर न भेटताही म्हणतो, मेसेज करतांना ही लिहीतो. सणावारी शुभेच्छा देतो, नवीन वर्षाच्या शुभेच्छा देतो. ओळख असलेल्यांना देतो, अनोळखी व्यक्तींनाही देतो.. नक्की का देतो अशा शुभेच्छा? कारण त्या व्यक्तींची असे म्हणून आपण दखल घेत असतो.

एक प्रकारचा आदर आपण त्यातून व्यक्त करीत असतो. वाढदिवसाच्या शुभेच्छांमुळे आपली कोणीतरी दखल घेतली आहे, आपली कोणाला तरी आठवण आहे ही जाणीव आपल्याला समाधान मिळवून देत असावी .

काय असतं हो नक्की वाढदिवसाला हे समाधान मिळणं? लहान असतांना वाढदिवसाला कोणी साधं चॉकलेट दिलं , तरी आनंद व्हायचा. मोठेपणी गिफ्ट मिळालं की व्हायचा!

आता वय वाढल्यावर, मला वाढदिवसाला काय हवे आहे? आणि का? असा विचार केल्यावर वाटतं कि खरंच माझं वय वाढलं, तसं ...मन पण वाढलं? मी वयाबरोबर माझी निरीच्छता वाढवायला हवी? माझ्यावर प्रेम करणाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या, तर त्यांनी मला आनंद, समाधान न होता, मी त्या कोरडेपणानी स्विकारल्या पाहिजेत? वयाबरोबर निरूत्साही, निर्मोही, व्हायला हव.?....

मग मी इतरांना पण शुभेच्छा देता कामा नये ना?... पण तसं होत नाही ना!... मला इतरांना जशा शुभेच्छा द्यायला आवडतात, तशाच इतरांनी मला दिल्या कि आनंद होतो... इतरांना सरप्राईज गिफ्ट देतांना मला जसा आनंद होतो, तसं मला कोणी गिफ्ट दिलं तरी मला आनंद होतो. मी त्या मागच्या भावना समजू शकते. कदाचित लहानपणी, तरूणपणी मी कधी कोणाकडे काही मागितले असेल, तसे आता कोणाकडे मी मागणार नाही! पण, न मागता कोणी काही दिले; तर त्याचा आनंद मी नाकारणारही नाही. काय दिले ह्याला त्यावेळी महत्वच नसते. “प्रेमाने दिले” हे महत्वाचे! मग तो वेळ असेल, प्रेमाचे दोन शब्द असतील, दोन फुलं असतील.......

हयाचाच अर्थ माझे वय वाढले, पण माझे मन अजून आहे तसेच आहे. मला अजूनही “कोणाला काहीतरी“ द्यायचे आहे, “कोणाकडून” काहीतरी” घ्यायचे आहे. आणि मला त्यात काहीच वावगे वाटत नाही. चुकीचे वाटत नाही.

माणसा माणसांमधले नाते टिकवणारे असे क्षण मला हवे आहेत. नवा गंध, नवा आनंद, नवे समाधान मला हवे असेल, तर मनातल्या ह्या सगळ्या भावना मला जिवंत ठेवायला हव्यात. अपेक्षा, इच्छा, मोह सोडून दगडासारखं, निर्जीव नाही मला बनायचंय!

आलेला प्रत्येक क्षण जर मला आनंदानी जगायचा असेल, तर मी मला आवडेल ती गोष्ट करून तो आनंद मिळवीन, ते सर्व सोडून नाही मिळणार मला आनंद! माझं वय कितीही वाढू दे, पण माझं मन लहान मुलासारखं सर्व साध्या गोष्टीतही आनंद घेणारंच राहू दे असं मला वाटतं. मला सगळे अनुभव घ्यायचे असतात, सर्व चवदार गोष्टी चवीने खायच्या असतात, चांगले ऐकायचे असते, चांगले पहायचे असते, सतत नवीन काही करायचे असते. त्यात मला आनंद असतो! काही गोष्टी एकट्यानी करण्यात मजा नसते. ह्या सर्वांतला रसास्वाद कोणाशी तरी शेअर करावा ही अपेक्षा वय वाढले तरी अजूनही आहे. मी त्या सर्व मला आनंद मिळणाऱ्या गोष्टी शेअर कराव्यात, तशाच कोणीतरी त्यांच्याही माझ्याशी शेअर कराव्यात, अशीही माझी अपेक्षा असते. नाते मग ते कुठलेही असो, त्यात अशी देवाण घेवाण असली तरच ते वाढते. आणि अशा छोट्या अपेक्षा, वय वाढले म्हणून करायच्या नाहीत, हे मला पटत नाही. तुम्हालाही असेच वाटते का?

मी प्रत्येक गोष्टीतला आनंद घ्यायचा प्रयत्न करत असते, इतरांना तो देत असते. त्यासाठी इतर अनेक अशा आनंद घेणाऱ्यांच्या संपर्कात मी रहायचा प्रयत्न करत असते. नव्या मित्र मैत्रिणींशी संवाद साधून, त्यांच्या आनंदाच्या वाटा, दिशांमध्ये मलाही आनंद घेता येतोय का ते शोधत असते.

जगात आलेला कोणीच परफेक्ट नाही, कोणीच दुसऱ्या सारखा नाही. प्रत्येकाची विचारसरणी वेगळी, मतं वेगळी, निर्णय वेगळे...प्रत्येकानी आपला प्रवास आपल्या मनासारखा करावा...हे एकदा पटलं की मग दुसऱ्याचं काही खटकतच नाही. मला मग ह्या बाबतीत पाण्याचा प्याला नेहमी भरलेलाच दिसतो आणि मग अर्धा पेला रिकामा आहे हे दिसतच नाही. प्रत्येक वेळी फक्त त्या गोष्टीकडे, व्यक्तीकडे सकारात्मक दृष्टीनेच पहाता येतं. त्यातल्या त्रुटी, चुका, कमतरता पेक्षा त्या व्यक्तीतल्या चांगल्या गोष्टीच मला दिसतात.
माझा हा दृष्टीकोन नेहमी असाच असावा! मला वाढदिवसाला काय हवे आहे? प्रत्येक क्षणी, “पेला अर्धा भरला आहे“ असे म्हणणाऱ्या व्यक्तींचाच सहवास मला घडू दे, ज्यामुळे मला फक्त आनंदच मिळेल आणि मग मी दामदुपटीने तो आनंद इतरांना देऊ शकेन.

वय वाढले की तुम्हाला पण असेच वाटते का? आणि तसे झाले की मग समाधान मिळतेच ना?

- **चित्रा जुवेकर मेहेंदळे,** सिॲटल, वॉशिंग्टन

## विचारांचा करा विचार

आपण दिवसभराचे अपडेट्स घेण्यासाठी न्यूज चॅनल्स पाहतो. बातम्या पाहिल्या की आपल्याला सध्या जगात काय काय सुरु आहे ते समजतं. वृत्तवाहिन्यांवर ज्या बातम्या दाखवल्या जातात त्या जशाच्या तशा प्रेक्षकांसमोर कधीच प्रसारित केल्या जात नाहीत. बातमी प्रसारित करण्यासाठी त्या बातमीमधील नको असलेला भाग आधीच काढून टाकला जातो. ज्याला आपण संकलन (Editing) असं म्हणतो. मनोरंजन वाहिन्यांवरदेखील कोणताही चित्रपट, मालिका, वेबसिरिजदेखील प्रसारित करण्याआधी तिच्या फिल्मचं एडिटिंग केलं जातं. एडिटिंगचे हे संस्कार केल्यामुळे एखादी बातमी, चित्रपट किंवा मालिका प्रेक्षकांना पाहण्यायोग्य किंवा मनोरंजक बनते.

मी जेव्हा एखादी वृत्तवाहिनी किंवा मनोरंजन वाहिनी पाहतो तेव्हा मला आपल्या मानवी जीवनात सदा सर्वकाळ सुरु असलेली एक वाहिनी आठवते. या वाहिनीचं नाव आहे ‘V 24 Taas’ म्हणजेच विचार २४ तास. इतर वाहिन्यांच्या ऑफिसमध्ये दिग्दर्शन किंवा एडिडिंगसाठी अनेक माणसे कार्यरत असतात. पण आपल्या ‘विचार २४ तास’ या वाहिनीचा निर्माता, दिग्दर्शक आणि एडिटर फक्त आपणच असतो.

आपल्या मनात विचारांची ही फिल्म आयुष्यभर सतत सुरुच असते. विचार करताना आपण निर्मात्याची भूमिका नकळत निभावतो परंतु त्या विचारांना एडिट करण्याचे किंवा दिशा देण्याचे काम मात्र नीट करीत नाही. साहजिकच विचारांची फिल्म जशी आहे तशीच्या तशीच जीवनपटावर प्रसारित होत राहते. ज्याच्या विचारांची फिल्म अनिष्ट, नकारात्मक असते त्याचा जीवनपट दुःखदायक, रडका होतो आणि ज्याच्या विचांराची फिल्म इष्ट, सकारात्मक असते त्याचा जीवनपट सुखदायक, आनंदी होतो. म्हणूनच जीवनविद्या सांगते ‘तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार’. तुम्ही जसे विचार करता तसा तुमच्या जीवनाला आकार मिळतो. (Mind moves from thoughts to things) वास्तविक आपल्या आयुष्यात प्रत्येक गोष्ट आयुष्यात दोनदा घडते प्रथम मनात आणि मग जीवनात. कारण ‘जसा विचार तसा जीवनाला आकार’ हा निसर्गाचा नियम आहे.

आपल्या विचारांना रंग, रुप, गंध, तेज आणि आकारही असतो. काही लोकांचे विचार काळपट रंगाचे असतात. आता काळपट रंगाचे म्हणजे काय ? ते विचार राग, द्वेष, तिरस्काराने भरलेले असतात. अशा लोकांचे विचार इतरांना आकर्षित करीत नाहीत. उलट ते एकमेकांना एकमेकांपासून दूर लोटतात. काहींचे विचार उजळ रंगाचे असतात. हे विचार सहकाराचे, मदतीचे असतात. उजळ विचार एकमेकांना एकमेकांकडे आकर्षित करतात. म्हणूनच तर काहीही कारण नसताना कधी कधी आपल्याला एखाद्याबद्दल जिव्हाळा वाटू लागतो. याला कारण त्याच्या मनात आपल्याबद्दल असलेले आपुलकीचे विचार असतात.

विचारांचा गंधही आपल्याला नकळत येत असतो. चांगल्या विचारांना आनंदाचा, मायेचा सुगंध असतो तर वाईट विचारांमधून द्वेष, मत्सराचा दुर्गंध येत असतो. एखाद्याचे विचार जरी आपल्याला समजले नाही तरी त्याच्या मनातील सुंगधी अथवा कुजकट भावना मात्र आपल्याला नक्कीच समजत असतात. कारण भावना मनातील विचारांच्या इंडिकेटर असतात. जसं ताप आला की आपण शरीराचे तापमान थर्मामीटरने तपासून पाहतो. तसं जर भावना तपासल्या तर आपल्या मनात काय विचार चालू आहेत हे लगेच समजू शकतं. इतरांच्या मनातील भावनांचा वास येत असल्याने आपल्याला त्यांच्या मनातील बऱ्या वाईट विचारांचा अंदाज येत असतो.



काही लोकांचे विचार तेजस्वी असतात. तेजस्वी लोकांच्या विचारांच्या संगतीमध्ये इतरांचे आयुष्यही उजळून निघते. जसे सदगरू श्री वामनराव पै यांच्या संपर्कात जे जे आले त्यांचे जीवन त्यांच्या ‘तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार’ या तेजस्वी विचांरांनी उजळून निघाले. माणसाचे विचारच त्याच्या जीवनात आकार घेत असल्याने चांगले विचार जीवनाला चांगला आकार प्राप्त करतात. लोकमान्य टिळक, शिवाजी महाराज अशा महान लोकांच्या तेजस्वी विचारांमध्ये इतरांचे जीवन उजळून टाकण्याचे सामर्थ्य होते. मात्र काही लोकांचे विचार हे निस्तेज असतात. असे लोक “माझं कसं होणार”, “मला काही जमणार नाही” अशा नकारात्मक आणि निस्तेज विचारांनी स्वतःचे जीवन अंधारमय करतात.

काहींचे विचार संकुचित असतात ते फक्त मी आणि माझं असा छोटा विचार करतात आणि जीवनात छोटेच राहतात. मात्र काही लोक सर्वांचा आणि सर्वसमावेशक व्यापक विचार करतात. स्वतःसोबत समाजाचे, राष्ट्राचे हित पाहतात. ज्यामुळे असे लोक स्वतः तर मोठे होतातच पण त्यांच्यामुळे राष्ट्राची प्रगती देखील होते. जसं डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांनी फक्त स्वतःपुरता विचार न करता राष्ट्राच्या प्रगतीचा विचार केला. त्यांच्या व्यापक विचारांमुळेच ते सर्वोच्च स्थानावर पोहचले.

आपल्या मनात येणारे विचार हे आपल्या ठिकाणी नांदणाऱ्या चैतन्यशक्तीतून निर्माण झालेले असतात. निसर्गनियमांनुसार विचारांना आकार घेण्याचे अंगीभूत सामर्थ्य प्राप्त होते. थोडक्यात आपण जसे विचार करतो तसे आपले जीवन घडते यासाठी आपण विचार करताना सावध राहायला हवं. पण आपण मात्र सतत बेसावधपणे विचार करीत असतो. माणूस कसे विचार करतो याचे मी तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

बऱ्याचदा लोक म्हणत असतात की, "वक्त से पहिले ओर नसीबसे ज्यादा कुछ नही मिलता." किंवा "कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है" असे विचार आपल्या हिताचे नसतात. वास्तविक कोणताही विचार करताना माणसाने त्यात कमीत कमी स्वतःचे तरी कल्याण पाहायला हवं. पण आजकाल माणसे स्वतःच्या हिताचाही विचार करताना दिसत नाहीत. ज्यामुळे ती स्वतःबद्दल आणि इतरांबद्दल चुकीचे बोलत राहतात. अनिष्ट विचारांमुळे त्यांच्या जीवनात अनिष्ट घडते याची साधी जाणीवही त्यांना नसते. अशा विचारांना 'नकारात्मक विचार' असे म्हणतात.

"माझी प्रगती होवू दे", "मला सुख मिळू दे" असा विचार माणसे करीत असतात. हे विचार चांगले असले तरी ते फक्त त्यांच्या हिताचे असतात. जे विचार स्वतःच्या हिताचे असतात पण इतरांच्या म्हणजेच समाजाच्या अहिताचे नसतात अशा विचारांना 'सकारात्मक विचार' असे म्हणतात.

पण जेव्हा आपला विचार स्वतःच्या हिताचा तर असतोच पण तो इतरांच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्याही हिताचा असतो तेव्हा तो 'सूपर पॉझिटिव्ह' विचार असतो. कारण हा विचार सकारात्मक असण्यासोबतच सहकारात्मक आणि सर्वसमावेशक असतो. सूपर पॉझिटिव्ह विचार केल्याने स्वतःसोबत इतरांचेही भले होते.

विचारांचे चक्र आपल्या मनात सतत सुरु असते यासाठीच आपण कोणते विचार करीत आहोत हे आपल्याला सतत चेक करावे लागते. जर आपल्या मनात येत आहेत तसेच विचार आपण करीत राहिलो तर त्यानुसार आपले जीवन घडणार. यासाठी आपण आपल्या मनात या तीन प्रकारांपैकी नेमके कोणते विचार येत आहेत हे पाहायला हवं. आपले विचार नकारात्मक, सकारात्मक की सर्वसमावेशक (सूपर पॉझिटिव्ह) आहेत हे ओळखायला हवं. जर नकारात्मक असतील तर ते विचार सकारात्मक आणि सर्वसमावेशक विचारांमध्ये परिवर्तित करायला हवेत. विचारांमध्ये असं परिवर्तन करणं म्हणजेच आपल्या मनात येणारे विचार दिग्दर्शित आणि एडिट करणं. विचार परिवर्तन करुन आपण आपल्या 'विचार २४ तास' वाहिनीवर चांगली फिल्म प्रसारित करु शकतो. आता तुमच्या मनात येईल की सूपर पॉझिटिव्ह विचार करण्यासाठी आम्ही नेमकं काय करायला हवं?

हे ईश्वरा, सर्वांना चांगली बुद्धि दे, आरोग्य दे
सर्वांना सुखात, आनंदात, ऐश्वर्यात ठेव
सर्वांचे भल कर, कल्याण कर, रक्षण कर
आणि तुझे गोड नाम मुखात अखंड राहू दे.

***सदगुरु श्री वामनराव पै***

जीवनविद्या तत्त्वज्ञानात यासाठीच 'विश्वकल्याणकारी विश्वप्रार्थना' निर्माण करण्यात आली आहे. विश्वप्रार्थनेमधील सर्व विचार 'सूपर पॉझिटिव्ह' आहेत. हे विचार स्वतःसाठी तर आहेतच पण विश्वातील प्रत्येकासाठी उपयुक्त असे आहेत. म्हणूनच विश्वप्रार्थना ही एक सकारात्मक, सहकारात्मक आणि सर्वसमावेशक विचार आहे.

विश्वप्रार्थना हा एक सुंगधित, तेजस्वी, उजळ विचार आहे. विश्वप्रार्थनेमध्ये सर्वांसाठी मागितलेले आहे. सर्वांसाठी म्हणजे नेमके कोणासाठी तर 'विश्वातील प्रत्येकासाठी' म्हणून हा एक सर्वव्यापक विचार आहे. शिवाय यात कोणताही नकारात्मक शब्द जाणीवपूर्वक वापरलेला नाही. सर्वांकडून शुभचिंतन व्हावं हा त्यामागचा उद्देश आहे.

विश्वप्रार्थनेत सर्वांसाठी चांगली बुद्धी, चांगले आरोग्य, सुख, आनंद, ऐश्वर्य मागितलं आहे. सर्वांच्या भल्याची, कल्याणाची, रक्षणाची इच्छा केलेली आहे. नियमित ही विश्वप्रार्थना म्हटल्याने माणूस या सर्व चांगल्या चांगल्या गोष्टी स्वतःकडे आकर्षित करुन घेवू शकतो. सर्वात शेवटी प्रार्थनेत सर्व काही दिल्याबद्दल परमेश्वराची कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. कारण कृतज्ञता व्यक्त करणे हा शुभचिंतन करण्याचा एक सोपा मार्ग आहे. जेव्हा तुम्ही कृतज्ञता व्यक्त करता तेव्हा तुम्ही सर्वांशी आणि पर्यायाने सर्वेश्वराशी जोडले जाता.

विश्वप्रार्थना कोणत्याही ठराविक धर्मातील देवदेवतेला उद्देशून केलेली नाही. विश्वातील सर्वेश्वराला स्मरुन केलेली आहे. त्यामुळे जगभरातील कोणत्याही देश, जाती, धर्म आणि भाषेची माणसे ही विश्वप्रार्थना म्हणू शकतात. यासाठीच आम्ही ही विश्वप्रार्थना विविध भाषांमध्ये निर्माण केलेली असून जगविख्यात गायकांकडून ती संगीतबद्ध करून आमच्या जीवनविद्या या युट्यूब चॅनेलवर प्रसारित केलेली आहे. विविध रागांमध्ये संगीतबद्ध केलेली ही विश्वप्रार्थना ऐकणे आणि मनातल्या मनात गुणगुणत राहणे हा एक विलक्षण अनुभव आहे.

\- **प्रल्हाद वामनराव पै,** आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## Brihanmaharashtra Mandal (North America)

Presents

# जीना इसी का नाम है !

*Live Life Meaningfully*

## दीपस्तंभ मनोबलचे यजुर्वेंद्र महाजन यांचा व्याख्यानांचा अमेरिका दौरा !

**दीपस्तभ मनोबलचा रंजक प्रवास... सोबत दिव्यांग, अनाथ विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी गोष्टी, गाणी, व नृत्यांचे विशेष व्हिडिओज्.**

कृपया शेजारी दिलेल्या शहरांमध्ये निवास असणाऱ्या आपल्या मित्र अथवा नातेवाईकांचे ई-मेल, व्हाटस्ॲप नंबर व राहत असलेलेल्या शहराचे नाव पाठवा. त्यांना कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती पाठवण्यात येईल.

**Tel #** 814-973-0319 **Email:** deepstambhngo@gmail.com



| Date | City |
|---|---|
| 1 to 5 April | Seattle |
| 6 to 10 April | San Francisco |
| 11 & 12 April | Los Angeles |
| 13 to 16 April | Phoenix |
| 17 April | Denver |
| 18 & 19 April | Dallas |
| 20 April | Chicago |
| 21 April | Indianapolis |
| 22 & 23 April | Austin |
| 24 to 26 April | Pittsburgh |
| 27 to 29 April | Boston |
| 30 April | Hartford |
| 1 May | New York City |
| 2 May | Philadelphia |
| 3 May | New Jersey /Philadelphia |
| 4 May | Baltimore/Washington DC |
| 5 to 7 May | Washington D C |
| 8 to 12 May | Amsterdam, Netherlands |

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue.
The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Eye of the Tiger***

**Artist: Neelima Gune-Gole**
Dimension: 24″ x 24″
Medium:Acrylic
Price : $700
Mandal: MMJAX



***Boosting Energy Mandala***

**Artist: Priya Kulkarni - Moghe**
Dimensions:14 x 14 inch circular
Medium: multi media
Price:Orders welcome
Mandal:Phoenix Metro Marathi Mandal Arizona



***Celebration***

**Artist: Avi Sadhu**
Dimensions: 10″ x 14″
Medium: Oil on board
Price: Not for sale.
Mandal: MMLA




***Hampi, Karnataka, ancient stone structures. Chariot***

**Artist: Mangala Tata**
Dimensions:10″x12″
Medium: Watercolor
Price: $150
Mandal: MMLA



***In the Pink***

**Artist: Meghana Mitragotri**
Dimensions:21″ x 14″
Medium: Watercolor
Price:Not for Sale



***Unhurried***

**Artist: Aparna Deshpande**
Dimensions:6″x9″
Medium: Ink & watercolor
Price:Not for Sale
Mandal: Marathi Vishwa NJ

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.